# यमुना देवी



अनुवाद सेवा

**- कर्नल(नि.) अशोक सायनाकर,पुणे.**

लक्ष्यवेधी
प्रकाशन

# श्रील प्रभुपादांची जिवलग कन्या यमुनादेवी दासी या सफला एकादशी दिवशी आपणास सोडून गेल्या (20 डिसेंबर 2011)

आदरणीय वैष्णव जन, हरे कृष्ण!



अत्यंत दुःखी अंतःकरणाने आणि तीव्र खेदाने मी आपणा सर्वांना निवेदन करू इच्छिते की, श्रील प्रभुपादांची प्रमुख शिष्या पूज्य यमुना देवी दासी या, आज सफला एकादशीच्या सकाळी, त्यांच्या मेलबोर्न येथील बीच फ्लोरिडा, आश्रम कुटीर येथून आपणा सर्वांना सोडून निजधामास गेल्या. त्या तिथे आपली परमप्रिय व भक्तिमय सेवेमधली जिवलग मैत्रीण दीनतारिणी माताजींच्या सोबत रहात होत्या.

पूज्य यमुना देवी दासी या समर्पित जीवन, त्यांचे गुरु श्रील प्रभुपाद यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध, शुद्ध कीर्तनाविषयी प्रेम, गायिलेल्या गौरवशाली आणि उत्कृष्ट गोविंदम् प्रार्थना (ज्या आपण सर्वजण नित्य ऐकतो आणि गातो), परमानंदी आणि आध्यात्मिक उपाख्यानांनी भरलेली पाकशास्त्रावरची पारितोषिके प्राप्त पुस्तके आणि इस्कॉनच्या तरूण पिढीला कृष्णभावनामृतात दिलेली महान प्रेरणा आणि प्रोत्साहन यासाठी सर्वांना परिचित आहेत.

या कधीही भरून न येणाऱ्या हानीचे वर्णन कुठून आणि कसे सुरू करायचे तेच मला कळत नाही. खरे तर त्यांच्या कोमल आणि बिघडलेल्या प्रकृतीमुळे त्यांना पुष्कळच वेदना आणि असह्य यातना होत होत्या. भगवान श्रीकृष्णांनी त्यांना हळुवारपणे आपल्या प्रेमळ आश्रयाखाली बोलावून घेतले यात काहीच शंका नाही.

मी स्वतःला भाग्यशाली मानते, कारण मी गेल्या बुधवारी, श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर यांच्या तिरोभाव दिनाची पावन संधी पूज्य यमुना देवी दासी यांच्या सहवासात व्यतित करू शकले.

श्रील प्रभुपाद यांच्या सेवेत,

मालती देवी दासी

# यमुना माताजी यांच्या काही आठवणी

## ...कालकंठ दास व जितमित्रा दासी

आम्ही गेल्या पाच वर्षात यमुना माताजी आणि दीनतारिणी माताजी यांचे जवळचे मित्र बनलो. आम्ही गैनेस्विल्लेमध्ये एक व्यस्त महाविद्यालयीन कार्यक्रम चालवतो. आम्ही २००६ मध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीत एखाद्या नव्या कार्यक्रमाच्या शोधात होतो. त्यापूर्वी आम्ही वंकुवर मंदिरात काही वर्षांपूर्वी राहिलो होतो आणि सेवा पण केलेली होती. त्यामुळे आम्ही शरणागतीला भेट देण्याचे ठरविले.

शरणागतीमध्ये आल्यानंतर काही अवधीतच आम्हाला वनबिहारी आश्रमाचा शोध लागला. कडब्याच्या पेंड्यानी बनविलेले, शेणाने सारविलेले आणि हिरव्या पन्हाळी पत्र्यांनी आच्छादिलेले हे घरकुल एका छोट्याश्या टेकडीवर विसावलेले होते आणि तिथून समोर पसरलेली पाच मैल लांबीची शरणागती दरी दृष्टीस पडायची. तिथेच राधा वनबिहारीचे सेवक यमुना आणि दीनतारिणी राहायचे. ज्यांना १९७० च्या दशकात श्रील प्रभुपाद यांनी विधवांसाठी एक आश्रम उघडण्यास सांगितले होते. या दोघींनी तेव्हापासून या ना त्या स्वरूपात आणि कोणत्या ना कोणत्या स्थानी असा आश्रम चालू ठेवला होता. तसेच त्या त्यांच्या प्राणप्रिय राधा वनबिहारींची सेवा करीत असत. अलीकडे तर त्या ही सेवा याच मनोरम आश्रमातून करीत होत्या, जो त्यांनी स्वहस्ते बांधला होता.

शरणागती कृषी क्षेत्रामध्ये अनेक विस्मयकारक भक्त आहेत आणि त्यांनी अत्यंत आकर्षक आणि राहण्यायोग्य घरे बांधली आहेत. इथे आम्हाला मननशील आणि भक्तिमय कलाकुसरीची एक अद्वितीय कलाकृती पाहावयास मिळाली.

लाकडाच्या खरबरीत फळ्यांच्या रिपा, साल काढलेल्या ओंडक्याचा खांब आणि तुळ्या म्हणून वापर, खिडक्यांमध्ये रंगीत काचांचा वापर, भक्ती, पुष्पवाटिका, बांधकाम, स्वयंपाक इत्यादी अनेक विषयावरील शेकडो पुस्तके, नीटपणे ठेवलेली ओबडधोबड कपाटे, भव्य दिवाणखाण्याच्या मधोमध ठेवलेले हातांनी बनविलेले आणि अत्यंत आरामशीर लाकडी साहित्य, पाठिमागे रंगीत काचेचा वृंदावनातील गोपींचा देखावा असलेला अत्युकृष्ट देव्हारा, संपूर्ण



आश्रमाला उबदार राखण्याचे कार्य करीत असणारी शेकोटी आणि अत्यंत कल्पकतेने बनविलेले आणि त्या शेकोटी भोवती साकारलेले स्वयंपाक घर, सर्व प्रकारे निसर्गाशी मैत्री साधणारी आणि कल्पक व्यवस्था जी पूर्णतः निसर्गावर आधारित आणि निसर्गाशी पूरक आहे, सौंदर्यदृष्टी पूर्वक मांडलेल्या मांडण्या आणि फडताळे – आणि त्याच्यावर मांडलेला अनमोल भक्तिमय ठेवा : उदा. श्रील प्रभुपाद यांचा मूळ स्वरूपातला तीन कप्प्यांचा कूकर.

रंगीत काचेचे अतिसुंदर आणि नयनरम्य काम पाहून मी यमुना देवींना विचारले की हे काम कोणी केले? ''यमुना देवी'', हे त्यांचे काहीसे रूक्ष पण करारी उत्तर ऐकून मला कळून चुकले की या विषयावर आता आणखी काही विचारण्यासारखे राहिलेले नाही.

यमुना आणि दीनतारिणी यांनी आम्हाला त्यांच्या आनंददायक चित्तवृत्तीने मोहून टाकले आणि त्यांच्या श्रील प्रभुपाद यांच्या प्रती निःस्वार्थ समर्पणाने प्रेरित केले. त्यांच्या भेटीमुळे आमचा कल शरणागतीकडे झुकला आणि आम्ही मनोमन ठरवले की, उन्हाळ्याची सुट्टी व्यतीत करण्यासाठी शरणागती हीच योग्य जागा आहे. या दोघी महिला या आश्रमाचा जीव की प्राण होत्या. त्या दोघी नित्य पहाटेचा मंगल आरतीचा कार्यक्रम नियमितपणे

आयोजित करत असत आणि तो सर्वांसाठी खुला असे. याखेरीज दर आठवड्याला संध्याकाळच्या ग्रंथ वाचनाच्या आणि कीर्तनाच्या किमान दोन-तीन बैठकी असायच्या. आमच्या तिथल्या वास्तव्याच्या काळात आम्ही मंगल आरतीचा एकही कार्यक्रम चुकवला नाही. तसेच त्यांच्या सत्संगाच्या अवीट गोडीचा आनंद लुटण्यासाठी आमच्या निवास स्थानापासून तिथपर्यंतचा दोन मैल चालण्याचा किंवा गाडीने जाण्याचा आमचा नियम कधीच चुकला नाही.

यमुना आणि दीनतारिणी नित्य पहाटेचा मंगल आरतीचा कार्यक्रम आळीपाळीने करत असत. ज्या दिवशी यमुना देवी गुर्वाष्टकम् गायच्या तेव्हा त्या स्वतःच एका छोट्या की बोर्डावर संगीताची साथ द्यायच्या. त्या की बोर्डची मुलायम घंटेसारखी मंजुळ किणकिणाट यमुनादेवींच्या हळुवार, मृदू आणि दैवी वाणीत मिसळल्यावर कॅनडाच्या पर्वतराजीतील भल्या पहाटेच्या शांत वातावरणाला एक प्रकारचा धीरगंभीर आणि भक्तिमय मुलामा चढत असे. एकाने गायचे आणि बाकीच्यांनी पाठीमागून म्हणायचे या पारंपारिक पद्धतीपेक्षा, सर्वांनी एकत्रितपणे गावे असा यमुनादेवींचा आग्रह असे. त्यामुळे एक प्रकारचे उबदार स्वैरैक्य निर्माण होत असे आणि वर्णाश्रम, लिंग, वरिष्ठता इत्यादी सर्व शारीरिक स्तरावरचे विचार विरघळून जात असत आणि त्यामुळे सर्वजण श्रील प्रभुपाद यांच्या आणि राधा वनबिहारीच्या प्रेमभावनेच्या स्तरावर परस्परांत पूर्णपणे मिसळून आणि सामावून जात असत.

कीर्तनानंतर प्रत्येकजण एक तास हरिनामाचा जप करत असे. यमुना देवी कधी कधी त्यांची मोठ्या मोठ्या लाल लाकडी मण्यांची जपमाळ आणत असत. ही जपमाळ त्यांच्या श्रील प्रभुपाद यांच्या सोबतच्या प्रारंभीच्या आध्यात्मिक जीवनापासूनची साथी आहे. या माळेवर श्रील प्रभुपाद यांनी व्यक्तिशः त्यांच्यासाठी जप केलेला आहे. यमुनादेवी तिथे उपस्थित असलेल्या भक्तांना त्या माळेवर जप करण्यासाठी निमंत्रित करत असत. श्रील प्रभुपाद यांनी जपमाळेच्या स्वरूपात दिलेला कृपाशीर्वाद केवळ स्वतःसाठीच साठवून किंवा राखून न ठेवता त्या या आशीर्वादाचे सर्वांना प्रेमाने वितरण करत असत.

जपानंतर श्रीमद् भागवतावर प्रवचन होत असे. दीनतारिणी प्रत्येक प्रवचनाचा आरंभ पुस्तकातील एखाद्या निवडक उताऱ्याने करत असत. उदा. श्रील भक्तिविनोद ठाकूर यांचे आत्मचरित्र किंवा श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर यांचे लिखाण. त्यानंतर आम्ही श्रील प्रभुपाद यांचे भागवत वाचत



असू. दीनतारिणी नेहमी अनेक श्लोक आणि त्यांचा सारांश यावर अत्यंत सुंदर प्रकारे विवेचन करत असत. त्या नेहमीच सर्वांना सामावून घेत आणि परस्पर संवादातून चर्चा करत असत. यमुना देवी आपल्या विचारपूर्वक आणि मार्मिक प्रश्नांनी अशा चर्चांना चालना देत असत. त्यामुळे त्या दिवशीच्या श्लोकाचा विषय अनेक मनमोहक विषयांना स्पर्श करून जात असे. बऱ्याच वेळेला अशा प्रवचनांना आम्ही चौघेच उपस्थित असायचो. अशा वेळी आम्ही सर्व बाबींवर चर्चा करायचो. श्रील प्रभुपाद यांच्या सोबतचे समृद्ध अनुभव, आश्रम आणि समाजजीवनातील गतिमानता, कलियुगातील लोकांची अवस्था, भारतदेश, निसर्गाशी तदात्म्य पावून जगणे, गोमातेचे रक्षण, गौडीय मठ/इस्कॉन विषयक अनेक बाबी, येणारे उत्सव,समारंभ आणि कितीतरी.

प्रवचनाच्या दरम्यान त्या काळजी घेत की उपस्थितांपैकी प्रत्येकाला बोलण्याची आणि चर्चेत भाग घेण्याची संधी मिळेल. यमुना देवी श्रील प्रभुपाद यांच्या छोट्या छोट्या आठवणी सांगत असत. त्यांनी सांगितलेली एक आठवण अशी : एकदा भगवान बलरामांच्या आविर्भाव दिवशी यमुना देवी याना श्रील प्रभुपाद यांच्या खोलीत प्रवेश केला. श्रील प्रभुपाद भगवान बलरामांच्या एका असुर वधाच्या चित्रासमोर उभे होते आणि आपल्या अलौकिक शरीराने ते भगवान बलरामांच्या चित्रामधल्या आवेशाची नाट्यलीला करत होते.

त्यांनी श्रील प्रभुपाद यांच्या सेवेमधल्या काही रोमांचकारक आठवणी सांगितल्या. एकदा, लंडनमधल्या महोत्सवाची सिद्धता करताना, त्यांनी जॉर्ज हॅरिसनना निमंत्रित करण्यासाठी दूरध्वनी केला आणि त्यांना सांगितले की,



जॉर्ज हॅरिसनना पसंत असलेले भाताचे एक विशिष्ठ पक्वान्न त्या दिवशी बनविले जाणार होते. ‘‘मी तुमचे ताट वाढू का?’’ यमुना देवींनी त्यांना विचारले. ‘‘खरं तर तू दोन ताटे वाढून ठेव!’’ त्यांनी उत्तर दिले.

त्यांनी सांगितलेली आणखी एक आठवण : सुप्रसिद्ध राधा कृष्ण आल्बमचे ध्वनिमुद्रण करताना त्या आणि अन्य भक्त जॉर्ज हॅरिसन यांच्या स्टुडिओमध्ये रात्री उशिरापर्यंत जागे होते. तिथे जॉर्ज हॅरिसन आणि पॉल मॅकार्थी ध्वनिमिश्रणावर काम करत होते. बराच उशीर झाल्यामुळे काही भक्त जागा मिळेल तिथे झोपलेले होते. यमुना देवींनी संवादिनी घेतली आणि ‘‘भज हुरे मन’’ हे भजन गायला प्रारंभ केला. त्या सांगत : प्रारंभीच्या आणि अत्यंत बिकट काळामध्ये त्यांनी ते भजन श्रील प्रभुपाद यांचे ध्वनिमुद्रण ऐकून शिकून घेतले होते. त्या वेळी वैष्णव गीतांचे पुस्तक अस्तित्वात नव्हते.

यमुना देवी संवादिनीच्या साथीने भजन गात असताना त्यांना हे माहित नव्हते की, जॉर्ज हॅरिसन त्या भजनाचे ध्वनिमुद्रण करत होते. यमुना देवींनी पुष्कळ आढेवेढे घेतले, पण जॉर्ज हॅरिसन ते भजन आपल्या आल्बममध्ये समाविष्ट करण्याविषयी ठाम होते. त्यांनी त्या भजनाचे ध्वनिमुद्रण केवळ हातांच्या टाळ्यांच्या तालावर केले. नंतर कळले की, आल्बममध्ये त्या भजनाचे शीर्षक ‘‘भज मन हुरे’’ असे लिहिले गेले होते. श्रील प्रभुपाद म्हणाले ‘‘असू दे, तू ते नंतर ठीक करू शकतेस!’’

खरं तर यमुना देवींची अशी प्रवचने संपूर्ण दिवसभर चालू राहिली तरी आम्हाला आनंदच वाटला असता. पण माताजी मात्र ते प्रवचन ठरावीक वेळेत संपवित असत. प्रवचनानंतर त्या महाप्रसादाचे वितरण करत असत आणि त्या दिवसासाठी नेमून दिलेल्या सेवेसाठी सर्वांना पिटाळत असत. यमुना आणि दीनतारिणी माताजींसाठी दिवसभरात लेखन, स्वयंपाक, उद्यानकाम, आश्रमातली दैनंदिन कामे, आलेल्या अतिथींचा पाहुणचार, आठवड्याभराचा बाजारहाट आणि धोब्याकडचे कपडे आणणे तथा देणे यासाठी नजिकच्या

नगराचा फेरफटका, शिवाय कलाकुसर आणि गवळणींसाठी काही योजना इत्यादी अनेक व्यवधाने असत. (शरणागती परिवारांमधल्या या ५-६ किशोरवयीन तरुण मुली त्यांच्या या साठीतल्या चिरतरुण मैत्रिणींवर मनापासून प्रेम करत).

बुधवारी संध्याकाळी बरेचसे भक्त चैतन्य चरितामृत वाचनासाठी एकत्र येत असत. यमुना आणि दीनतारिणी माताजींची प्रेरणा आणि प्रोत्साहन यामुळे ही मंडळी वर्षानुवर्षे हा उपक्रम चालू ठेवून आहेत आणि आता त्यांची चैतन्य चरितामृत वाचनाची तिसरी उजळणी चालू आहे. शुक्रवारची रात्र केवळ भजनासाठी राखून ठेवलेली असे. प्रत्येक उन्हाळ्यात यमुना आणि दीनतारिणी माताजी अलाचुआ इथले कार्तीमसा व त्यांची पत्नी - शरणागती आश्रमामधली पूर्वाश्रमीची गवळण - राधा यांच्यासाठी विशेष भजनसंध्या आयोजित करत. यमुना आणि दीनतारिणी माताजींच्या समवेत हे जोडपे दोन ते तीन आठवड्यांची भजन मॅरथॉन आयोजित करत असे आणि या अवधीमध्ये ते भक्तिविनोद ठाकूर यांची शरणागती तथा गोद्रुम कल्पतरूमधली सर्वच्या सर्व भजने गाऊन पूर्ण करत.

भजने गाताना यमुना माताजींची जणू समाधी लागलेली असे : डोळे मिटून, संगीताच्या तालासोबत मागे-पुढे डुलत, पूर्णपणे अंतर्लीन होऊन त्या आपल्या सुस्पष्ट आणि हृदयाला भिडणाऱ्या उच्च स्वरांत मोठ्या उत्साहाने आणि पूर्णतः तल्लीन होऊन गात असत. प्रत्येक भजनाच्या शेवटी अत्यंत तृप्त होऊन त्या म्हणत, ''अहाहा, अगदी अमृतच, अगदी अमृतच!''

शरणागती महोत्सवात यमुना माताजी गवळणींच्या भजनांचे आयोजन करत असत. शरणागती कृषिक्षेत्राच्या साऱ्या कार्यक्रमांच्या नेतृत्वाची धुरा त्या नेहमीच आपल्या खांद्यावर घेत असत. एकदा शरणागती रथयात्रेसमोर त्यांनी ध्वनीवर्धक हातात घेतला आणि रथासमोर उभ्या असलेल्या भक्तांसमोर प्रास्ताविक भाषण केले. शरणागती दरीच्या दोन्ही बाजूंनी पसरलेल्या, घनदाट वनराईने आच्छादिलेल्या भव्य आणि वैभवशाली पर्वतराजीकडे निर्देश करत त्यांनी घोषित केले, ''न्यूयार्कच्या रथयात्रेत असतात त्यापेक्षा अधिक जीव इथे वास्तव्य करत आहेत आणि त्या सर्वांना आपण हरिनाम गजराच्या रूपाने आशीर्वाद द्यायचे आहेत''.

विशेष प्रसंगी यमुना माताजी आमच्यासाठी स्वयंपाक बनवत असत.

त्यांनी बनविलेले प्रत्येक पदार्थ नितांत रुचकर आणि अत्यंत आरोग्यदायी असायचे. एकदा कोणीतरी ''चौंस'' विषयी काहीतरी म्हणाले, तो शब्द ''छौंक'' (तकडा/फोडणी) आहे. त्यांनी उत्तर दिले. ''चौंस'' हा शब्द कीर्तनानंद यांनी शोधून काढला आहे आणि त्याचा सर्वसाधारणपणे अर्थ असा की कडकडीत तापलेल्या तुपात मसाले टाकायचे आणि त्यांना कोळशाप्रमाणे काळे करायचे.

यमुना देवींनी जुन्या काळातली आणखी एक आठवण सांगितली. तेव्हा मंदिरामध्ये घरगुती आणि कौटुंबिक वातावरण असायचे आणि सर्वजण परस्परांना ''प्रभू'' म्हणूनच संबोधित करायचे. इथल्या भक्तांना इस्कॉनमध्ये कालांतराने विकसित झालेल्या औपचारिकतांची काळजी नव्हती. ''यमुना माताजी'', मी एकदा त्यांना म्हणालो. ''काय म्हणता कालकंठ पिताजी?' त्या उत्तरल्या.

यमुना आणि दीनतारिणी माताजींकडून आम्ही जे जे काही ऐकले आणि शिकलो ते ते आम्ही मनापासून ग्रहण केले आणि ते गैनेस्विल्लेमध्ये नेऊन त्याचा तिथे उपयोग केला. आम्ही तिथल्या भक्तांमध्ये प्रेमाने, आपलेपणाची आणि सहभागाची भावना जागवली. त्यामुळे भगवान श्रीकृष्णांनी आम्हाला आमच्या समाजासाठी पुष्कळ नवे वैष्णव दिले. तीनेक वर्षांनंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत शरणागतीला येण्याचा परीपाठ आम्ही चालू ठेऊ शकलो नाही. त्यानंतर आम्ही यमुना आणि दीनतारिणी माताजींना काही वेळा भेटलो : अलाचुआमध्ये, भारतात, आणि शेवटी मेलबोर्नच्या समुद्रकिनाऱ्यावरील त्यांच्या कुटीर मध्ये. यमुना माताजींची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. तरीपण त्या दोघी सदैव सुखी आणि कृष्णभावनामृतामध्ये उत्साही असायच्या. त्यांची दृढ साधनाभक्ती आणि हरिनाम जपाविषयीचे प्रेम आणखीनच वृद्धिंगत झाले होते.

यमुना देवी त्यांना भेटलेल्या इतर लोकांप्रमाणे आमच्याशी पण अत्यंत दयाळू आणि प्रोत्साहन देणाऱ्या होत्या. त्यांच्या निर्वाणापूर्वी एक-दोन दिवस आधीच त्यांनी आम्हाला हे पत्र पाठविले होते :

प्रिय काल आणि जिता,

हरे कृष्ण! प्रणाम, दंडवत, जय श्रील प्रभुपाद!

मनापासून आशा करते की तुम्ही दोघेही सुखी आहात, सर्व प्रकारे स्वस्थ आहात. मी तुमच्या श्रील प्रभुपादांच्या सेवेसाठीचे प्रयत्न इतक्या दूर

अंतरावरूनही अक्षरशः जाणू शकते.

श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकुरांच्या तिरोभाव दिनी आणि आमच्या इथल्या विग्रहांच्या ३६व्या वाढदिवशी घेतलेले फोटो तुम्हाला पाठवावेसे वाटले. मला आशा आहे की ते तुमच्या मुखावर हास्य फुलवतील आणि तुमचा दिवस प्रकाशमान, तेजोमय आणि आनंदमय बनवतील''.

यमुना देवी, तुम्ही सदैव आमचे जीवन उजळून टाकले आहे आणि तुमच्या आठवणीने आम्हाला नेहमीच आनंद वाटेल. तुम्ही आमच्या जीवनातले कधीही बदलता न येण्याजोगे सर्वस्व आहात. तुम्ही खऱ्या अर्थाने श्रील प्रभुपादांच्या अत्यंत निकटच्या सनातन सोबती आहात. तुमचे या मर्त्य जगातले अस्तित्व संपले आहे आणि भगवान श्रीकृष्णांनी तुम्हाला आपल्या अविनाशी जगतामध्ये अत्यंत हळूवारपणे परत आणले आहे. आम्ही मनोमन विनम्र प्रार्थना करतो की, आम्हाला कधीतरी तुमच्या मधुर स्वरातली मंगल आरती आणि कीर्तन ऐकायला मिळू दे. तुमच्या भक्तिची अतूट आणि अवीट शक्ती आम्हाला जाणवू दे. तुमच्या माधुर्यपूर्ण भक्तिमार्गातील मोहकता आम्हाला अनुभवायला मिळू दे आणि तुमच्या श्रील प्रभुपादांविषयी निःस्सीम आणि निर्व्याज प्रेमापासून आम्हाला शिकायला मिळू दे.

आम्ही प्रार्थना करतो की, आमची विस्मयकारक गुरुभगिनी दीनतारिणी माताजींना श्रील प्रभुपादांप्रति त्यांची सेवा अखंडपणे चालू ठेवण्यासाठी मानसिक शांती आणि उदंड सामर्थ्य लाभू दे आणि त्या आम्हाला सदैव प्रेरणा, स्फूर्ती आणि प्रोत्साहन देत राहोत.

--------------

# यमुना देवी दासी यांना एक अभिवादन

## भक्तिमाधुर्य गोविंद स्वामी

प्रिय प्रभूजी आणि माताजी,

दंडवत प्रणाम.

आपणा सर्वांचे एकमेव आशास्थान असलेल्या श्रील प्रभुपादांचा जयजयकार असो.

माझ्या मनात आज संमिश्र भावनांचा कल्लोळ आहे, कारण मी माझ्या एका धर्मभगिनीचा – यमुनादेवींचा – मृत्युलेख लिहायला बसलो आहे. मी संमिश्र भावना म्हणतोय, कारण मला पूर्णपणे जाणीव आहे की त्यांची प्रकृती गेले कित्येक दिवस फारशी बरी नव्हती. म्हणजेच त्यांना कमी वा जास्त प्रमाणात यातना सोसाव्या लागत होत्या हे ओघानेच आले. त्यांचा व माझा संपर्क जवळ जवळ गेल्या दहा वर्षात आलेला नव्हता. तरी पण मी त्यांना अखेरचे पाहिले तेव्हा पण त्यांची प्रकृती म्हणावीशी चांगली नव्हती. म्हणूनच त्यांना आध्यात्मिक शरीराने श्रील प्रभुपाद, श्री श्री राधा कृष्ण यांच्या सेवेसाठी जाण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांचा एक प्रकारे उज्ज्वल व मंगलमय उद्धारच झाला आहे.

काही प्रभुजी म्हणतात की, आपण त्यांच्यासाठी प्रार्थना केली पाहिजे, पण मी अत्यंत आदरपूर्वक सांगू इच्छितो की, जेव्हा श्रील प्रभुपाद व श्रीमती राधाराणी त्यांना स्वगृही घेऊन जाण्यासाठी समक्ष आले होते हे निर्विवाद व नि:संशय सत्य आहे, तेव्हा त्यांच्यासाठी प्रार्थना करण्याची तिळमात्र आवश्यकता नाही.

श्रील प्रभुपाद यमुना देवींपेक्षा कितीतरी कमी प्रगत भक्तांना परमपिता परमेश्वराच्या घरी नेण्यासाठी स्वत: आलेले आहेत. तर मग यमुना देवींसारख्या अत्यंत प्रगत व उन्नत आत्म्याची गोष्टच निराळी.

मी यमुना देवी दासींचा सदैव ऋणी आहे. विशेष करून जेव्हा मी सॅन फ्रॅन्सिस्को मंदिरात नव्याने दाखल झालो, तेव्हा त्यांनी माझ्यासाठी जे विस्मयकारक व आपुलकीचे वातावरण निर्माण केले त्यासाठी. त्या आणि त्यांचे विस्तृत कुटुंब : गुरुदास, श्यामसुंदर, जानकी आणि इतरांनी मला एक अत्यंत प्रेमळ ऊब दिली ती माझ्या हृदयाला स्पर्श करून गेली. खरे तर त्यामुळेच मी या

नव्या आध्यात्मिक वातावरणात अतिशय सहजपणे व फार लवकर रुळलो. यमुना देवी या दयाळू, हळुवार मनाच्या, कनवाळू , मनापासून सर्वांची काळजी वाहणाऱ्या, आईरसारख्या वत्सल, सोशिक तथा वैष्णवांच्या अनेकानेक गुणांची खाण होत्या.

यमुना देवी यांनी  बनविलेला स्वयंपाक हा नेहमीच कल्पनातीत मधुर व चविष्ट असे. आणि का नसावा? त्यांना श्रील प्रभुपाद यांनी व्यक्तिशः स्वयंपाक शिकविला होता.  स्वयंपाक सेवेतील माझे अगदी सुरुवातीचे काम होते त्यांना रविवारच्या मेजवानीसाठी सामोसे बनविण्यासाठी हातभार लावणे. मला वाटायचे सामोश्यांच्या कडा कलात्मक रित्या दुमडायला शिकण्यातसुद्धा खूप मजा आहे. यमुना देवी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या देखरेखीखाली सर्व पदार्थ शुद्ध तुपात बनविले जात असत. त्या काळात भक्तांना बिन मिठाच्या लोण्यापासून स्वतः तूप बनवावे लागत असे. त्यासाठी लोण्याचे सोनेरी तुपात रूपांतर होईपर्यंत ते मंद आचेवर कढवावे लागत असे व त्यासाठी कित्येक तास लागायचे. पण शुद्ध तुपासाठी भारतीय दुकानाकडे धाव घेण्याचा प्रश्न कधीच उद्‌भवत नसे, कारण त्यावेळी अशी दुकाने नव्हतीच. तथापी एकाही भक्ताने स्वयंपाकासाठी वनस्पती तेल वापरण्याचा चुकुनही विचारसुद्धा केला नाही. खरे तर तसे त्यांच्या डोक्यात कधी आलेच नाही. कारण त्या सर्वांना श्रील प्रभुपादांनी शिक्षण दिले होते. त्या वेळी भक्त इतके गरीब असत की त्यांच्याजवळ मंदिराच्या खोलीचे भाडे भरण्याइतपत सुद्धा पैसे नसायचे. तरीपण  आधुनिक इस्कॉनप्रमाणे तेव्हा किंमत किंवा खर्च यांचा विचार केला जात नसे. सर्व स्वयंपाक शुद्ध तुपातच व्हायचा. कारण एक तर तो भगवान जगन्नाथ यांच्यासाठी बनविला जायचा आणि मुख्य म्हणजे श्रील प्रभुपादांची तशी कडक सूचना होती.

यमुना माताजींचा उचित आदर सन्मान व गौरव करण्याचा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे त्यांनी मार्च २००० मध्ये जी.बी.सी.समोर मनापासून केलेले आवाहन अंमलात आणणे. अत्यंत कळकळीने व तळमळीने त्यांनी एकाच गोष्टीवर भर दिला होता की इस्कॉनमधल्या विविध स्तरावरील नेतृत्वामध्ये कमालीची सचोटी व पारदर्शकता असायला हवी. कुठलेही नेतृत्व केवळ कार्मिक हुद्दा किंवा आर्थिक स्थिती पाहून दिले जाऊ नये. मग तो इस्कॉन मायापूरसारखा महान प्रकल्प का असेना. इस्कॉन आज जगाच्या सर्व कानाकोपऱ्यात विस्तार पावले आहे. आपण सर्वजण यमुना माताजींच्या या आंतरिक इच्छेचा मान ठेऊन इस्कॉनच्या नैतिकतेची व नीतिमत्तेची पताका अधिकाधिक ऊंचावूया.

# इस्कॉन जी.बी.सी.द्वारा यमुना देवींचे पुण्यस्मरण



अत्यंत विषण्ण मनाने गंभीरपणे इस्कॉन जी.बी.सी.यमुना देवींच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करीत आहे. त्यांनी आपल्या आयुष्याची किमान ४५ वर्षे भगवान श्रीकृष्ण व श्रील प्रभुपाद यांच्या सेवेसाठी समर्पित केली. त्या अनेकांच्या समुपदेशक, मार्गदर्शक व परममित्र होत्या; तसेच त्या इस्कॉनच्या अत्यंत जिवलग सदस्य व नायिका होत्या. इस्कॉनच्या प्रत्येक मंदिरात श्रृंगार दर्शन त्यांनी गायिलेल्या 'गोविंदम् आदि पुरुषम्' या प्रार्थनेने होते. यमुना देवी या इस्कॉनच्या नुकत्याच पंख फुटलेल्या अवस्थेत एक अत्यंत प्रभावी भक्त होत्या. इस्कॉनच्या स्थापनेच्या वेळी जे काही हाताच्या बोटांवर मोजण्या इतपत भक्त होते त्यात यमुना देवींची गणना होते. जे इस्कॉनमध्ये नंतर आले ते ही संस्था भक्कमपणे ऊभी राहिल्यानंतर आले होते. पण यमुना देवी या इस्कॉनच्या स्थापनेच्या वेळी जे मोजकेच भक्त होते त्यांपैकी एक होत्या.

यमुना देवींनी इस्कॉन जी.बी.सी.ला सन २००० मध्ये संबोधित करताना आपले व श्रील प्रभुपाद यांचे जिव्हाळ्याचे संबंध विषद करताना सांगितले होते, ''पुरुष वा स्त्रियांमधला स्वाभाविक कल पाहून प्रभुपाद त्यांच्या त्या त्या गुणांचा प्रचार कार्यात खुबीने व सुरेखरीत्या वापर करून घेत असत. कित्येक वर्षांपर्यंत निरनिराळ्या देशांत व वेगवेगळ्या परिस्थितींत मला त्यांची व्यक्तिगत सेवा करण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्यांनी मला योग्य ते प्रशिक्षण दिले व अधिकाधिक जबाबदारी स्वीकारण्यास प्रेरित केले. त्यांनी मला कीर्तनात पुढाकार घेणे,प्रचवन देणे, विविध विभागांचे व्यवस्थापन,आलेल्या पाहुण्यांचा पाहुणचार व निवासाची सोय, अनेक नेत्यांशी गाठीभेटी आणि कृष्णभावनामृताचा प्रसार करण्यासाठी सदैव प्रोत्साहित केले. भारतातील



इस्कॉनमध्ये पूर्वी स्त्रियांना जवळ जवळ मज्जावच होता. तरीपण त्यांनी मला भारतातील निरनिराळ्या मंदिरांमध्ये पाठवले व स्वयंपाक तथा अर्चाविग्रहांच्या सेवेचा विधी शिकून घेण्यास सांगितले. तसेच त्यांनी मला अन्य भक्तांना या दोन्ही कलांमध्ये प्रशिक्षित करण्यासाठी देखील वारंवार सांगितले.''

यमुना देवी इतरांची मनोभावे काळजी घेण्याबद्दल व अत्यंत कनवाळू स्वभावाबद्दल सर्वांना परिचित होत्या. त्या इस्कॉनमध्ये व त्यापलीकडेही दूरवर प्रसिद्ध होत्या. तरीही त्या कमालीच्या दयाळू व निगर्वी होत्या. यमुना देवी सदैव हरे कृष्ण महामंत्राचा जप किंवा कीर्तन यांत मग्न असत आणि जी काही सेवा करत असतील त्यात पूर्णपणे गढून गेलेल्या असत. त्यांचे स्वच्छतेचे व शुचितेचे परिमाण अत्यंत उच्च प्रतिचे होते; आणि त्यांनी श्रील प्रभुपादांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी शब्द, कृती, स्वभाव व हृदयापासून स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले होते. त्यांना जे जे भेटले त्यांना श्रील प्रभुपादांच्या कसलीही तडजोड न करण्याच्या आदर्शाचा व प्रगाढ प्रेमाचा प्रत्यय यमुना देवी यांच्या माध्यमातून आला.

यमुना देवींनी, भगवान श्रीकृष्णांचे पाकशास्त्र : भारतीय स्वयंपाकाची कला'' या नावाचे स्वतःचे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाने International Association of Culinary Professionals Cookbook of the year व इतर अनेक बक्षिसे पटकावली. त्यांनी त्यांच्या आयुष्यातली अलीकडची बरीच वर्षे पश्चिम कॅनडामधील शरणागती या कृषी क्षेत्रावरील भक्तांना स्वतःच्या उदाहरणाने व आचरणाने शिकविण्यात व्यतीत केली.

यमुना देवींचा भाव त्यांनी श्रील प्रभुपाद यांना २००२ मध्ये अर्पिलेल्या व्यक्तिगत आदरांजलीमधून सुंदरपणे प्रतिबिंबित झाला आहे. ''प्रिय प्रभुपाद, मला आठवते की, तुमच्या सहवासात कीर्तन किती उत्कट आणि आनंदमय असायचे. त्या कीर्तनात सर्वजण स्थळकाळाचे भान विसरून जायचे. तुमचा अंगठा करतालावरून अलगद उचलायचा आणि करतालांचा किणकिणाट वातावरणात सर्वत्र पसरायचा. तुमच्या मुखातून व स्वरयंत्रातून उमटलेला

अलौकिक नाद सर्वांना भारून टाकायचा. मला आठवते मी त्या शब्दब्रह्मात पूर्णपणे विलीन होऊन जायची आणि तुमचे सान्निध्य किंवा या भारलेल्या वातावरणापासून कधीच दूर जाऊ नये असे वाटायचे. याच संदर्भात मला एक प्रार्थना करायची आहे : आकाशगंगा मुंबई येथे अंततः गायिलेल्या तुमच्या अत्यंत आवडत्या 'हरी हरी विफले' या वैष्णव भजनाच्या गायनात तुम्ही तल्लीन असताना, प्रभुपाद.. एकदाच, फक्त एकदाच मला तुमच्यासाठी मायक्रोफोन धरू द्या. माझी एकच विनम्र प्रार्थना आहे की भविष्यात एकदा तरी तुम्हाला समोरासमोर पाहण्याचे भाग्य मला लाभावे. माझे हे स्वप्न सत्यात साकारण्यासाठी कदाचित मला अनेक जन्म वाट पहावी लागेल. प्रभुपाद, हे स्वप्न साध्य करणे कदाचित अत्यंत धीमे, दुष्कर किंवा माझ्यासारख्या पतितेसाठी अशक्यप्राय असेल. तरीपण मला यापेक्षा आणखी काहीच अपेक्षा नाही. मला आकृष्ट करणारे यापेक्षा दुसरे काहीही नाही. तुम्हाला भेटण्याच्या या ध्येयाचा दीर्घकाळ पाठपुरावा करण्यासाठी मला आशीर्वाद द्या.''

तुमची शाश्वत सेविका

यमुना देवी

श्रील प्रभुपादांची अत्यंत प्रिय धर्मकन्या व आमची आवडती भगिनी यमुना देवी या भौतिक जगतातून दृष्टीआड झाल्यामुळे आम्हा सर्वांना मनोमन खेद आहे. त्याचबरोबर तिच्या तीव्र इच्छेनुसार श्रील प्रभुपाद यांच्याबरोबर तिच्या पुनर्मीलनाचा आम्हाला आत्यंतिक हर्ष आहे.

-----------

# यमुना देवींना एक पत्र

प्रिय यमुना देवी,

कृतज्ञतापूर्वक व सस्नेह!

तुमच्या मला आलेल्या प्रत्येक पत्रावर, भेटकार्डावर व भेटीवर तुम्ही मला असेच संबोधन करायच्या. तुमची माझी ओळख असणे याला मी दैवी अनुग्रह व माझे सुदैव समजतो. तुम्ही ज्या प्रकारे माझे आयुष्य बदलून टाकले, तसे अन्य कोणीच बदलू शकले नसते. तुमचे पूर्ण आयुष्य म्हणजे परमप्रिय प्रभुपादांच्या सेवेचा हिमालयासारखा प्रचंड ठेवा होता. तुमचे प्रभुपादांच्या विषयीचे प्रेम अतिशय निर्व्याज व सुस्पष्ट होते. मला तुमच्या जीवनाच्या भक्तिमय सेवेच्या प्रवासात काही वर्षे बरोबर येण्याची अनुमती दिलीत. तुमच्या अनमोल सहवासामुळे माझे जीवन सुसंस्कृत व संपन्न झाले. आणि भौतिक व आध्यात्मिक जगतातील कित्येक दरवाजे माझ्यासाठी उघडले, जे एरव्ही कधीच शक्य झाले नसते. त्यामुळे माझा अध्यात्मावरचा विश्वास वाढला. तुम्ही केवळ माझ्यासाठीच नव्हे तर अनेकांसाठी एक अमूल्य वारसा दिला आहे. एक वरिष्ठ या नात्याने तुमच्याकडून मला बहुमूल्य मार्गदर्शन व सूचना मिळाल्या याचा मला अभिमान वाटतो. मला मनापासून जाणवायचे की, तुम्ही मला चांगल्याच ओळखला आणि तुम्हाला माझे मन पूर्णपणे समजले आहे. तुम्ही मला तुमच्या लहान भावाप्रमाणे वागवायच्या. मला तुमच्या सहवासात उगीचच मी कुणीतरी खास असल्यासारखे वाटायचे.

तुम्ही मला आपण एकत्र व्यतीत केलेल्या कालावधीत कितीतरी भेटी दिलेल्या आहेत. खूप दिवसापूर्वी तुम्ही मला एक छोटासा पुतळा दिला होता, तो मूळचा तुमच्या आत्याचा किंवा मावशीचा होता. तो तुमच्याकडे वारसाने आलेला होता. कित्येक वर्षे मी तुमच्या कुटुंबाचाच एक हिस्सा होतो. त्या भेटीमुळे मी अतिशय भारावून गेलो होतो. तो पुतळा मी दररोज पाहतो आणि मला तो तुमची नेहमीच आठवण करून देतो.

तुम्ही दिलेल्या आणखी एका भेटीला माझ्या हृदयात अनन्यसाधारण स्थान आहे. सतत तीन वर्षे कष्ट केल्यावर तुमचे पाकशास्त्रावरचे पुस्तक एकदाचे मुद्रणालयात देण्यासाठी तयार झाले. मुद्रक किंगस्पोर्ट टेन्नेसी इथ होता व पुस्तकाची मुद्रण प्रत देण्यासाठी मी तिथपर्यंत प्रवास केला. मी पुस्तकाची



मुद्रिते तपासली व मुद्रणासाठी हिरवा कंदील दिला. जेव्हा मुद्रण पूर्ण झाले तेव्हा मुद्रकाने मला सांगितले की, मुद्रण क्षेत्रातल्या परंपरेनुसार नव्या पुस्तकाची एक प्रत हात-बांधणीची व अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असते. सामान्यतः अशा प्रतीची बांधणी कातडी असते. अर्थातच आम्ही तसे करणार नव्हतो, म्हणून ती प्रत सुंदर बदामी रंगाच्या आवरणाची बनविण्यात आली. ती कधी एकदा तुमच्या हातात देतो असे मला झाले होते. जेव्हा मी परतलो आणि तुमच्या हातात ते पुस्तक ठेवले तेव्हा तुमचे डोळे आनंदाने चमकून उठले. लगबगीने तुम्ही ते पुस्तक प्रभुपादांना अर्पण करण्यासाठी आत गेलात. तुम्ही अत्यंत प्रेमपूर्वक व काळजीपूर्वक पुस्तकाचे प्रत्येक पान प्रभुपादांना पाहण्यासाठी उलगडले. तुम्ही असे म्हटल्याचे मला नक्की आठवते की, ''ही खास प्रत मला काळजीपूर्वक जपून ठेवली पाहिजे. कारण ती कधीतरी ऐतिहासिक कारणासाठी वापरता येईल''. पुस्तक प्रभुपादांना दाखवून झाल्यावर तुम्ही जे काही केले ते पूर्णतः अनपेक्षित होते. तुम्ही मेजाजवळ बसलात, पुस्तकावर काहीतरी रेखाटलेत आणि ते पुस्तक माझ्या हातात परत दिलेत. मी ते उघडून पाहिले तेव्हा मला उमजले की तुम्ही त्या पुस्तकावर माझ्यासाठी व योगेश्वर प्रभुसाठी आभार प्रदर्शक संदेश लिहिला होता.

तुम्ही मला ते पुस्तक कायमचे ठेवून घेण्यास सांगितले. ते पुस्तक आजही माझ्याकडे आहे आणि माझ्यासाठी तो एक अत्यंत अनमोल ठेवा आहे.

एकदा न्यूयॉर्क इथे, आम्ही तुमचा विशाल नजराणा, 'भगवान कृष्णांचे पाकशास्त्र', पूर्ण करण्याच्या गडबडीत होतो. आम्ही प्रातःकालीन साधनेविषयी विचार-विनीमय करत होतो. अचानकपणे, या संभाषणाच्या मध्येच माझ्या डोक्यात जणू वीज चमकली : मी एका वेळी केवळ एकाच मंदिरातील विग्रहांना दिवसातून एकदाच नमन करू शकतो. तुम्ही मात्र जगभरातल्या प्रत्येक मंदिरातील सर्व अर्चा-विग्रहांना (गोविंदमच्या स्वरूपात) दररोज नमन करत असता आणि सदैव करत रहाल. तुमचे प्रभुपादांविषयीचे प्रेम आतूर आहे. जेव्हा मी हे तुमच्यासमोर नमूद केले तेव्हा तुम्ही काहीशा आश्चर्यचकित

झाल्यासारख्या दिसल्या. मला नाही वाटत की, हे कधी तुमच्या ध्यानी–मनीही आलेले असेल आणि तसे असले तरी तुम्ही ते वरकरणी तरी कधीच दाखविले नाही. यावर तुमचे नम्र उत्तर होते, ''मला रोज सकाळी प्रभुपादांना अभिवादन करायला मिळाले तर अधिक समाधान लाभेल.'' तुमच्या या निगर्वी उत्तरातच सर्व काही आले. माझ्या मनात तुमच्या आणि आपल्या आवडत्या भगिनी दीनतारीणी मातांजींच्याविषयी कितीतरी हृद्य आठवणी साठवलेल्या आहेत. तुम्हा दोघींनाही मी म्हणू इच्छितो, ''मनःपूर्वक धन्यवाद! मनःपूर्वक धन्यवाद!''

तुमच्या भौतिक सहवासाच्या अभावामुळे माझ्यासारख्या कित्येकांच्या जीवनात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे आणि त्यामुळे आमच्या मनावर खोलवर झालेला आघात शब्दांत व्यक्त करता येण्यासारखा नाही. तरीपण तुमच्या अतुल्य ईश्वरनिष्ठेमुळे, जेव्हा तुमचे गोविंदम् आमच्या कानावर पडेल किंवा तुमचे ''भगवान कृष्णांचे पाकशास्त्र'' आम्ही वाचू, तेव्हा आम्हाला तुमच्या सहवासाची अनुभूती लाभेल. श्रील प्रभुपादांच्या आठवणी जतन करण्यासाठी तुम्ही तुमच्या आयुष्यभरात केलेल्या अमाप स्वार्थत्यागाबद्दल आम्ही तुमचे सदैव ऋणी आहोत. त्याचबरोबर तुमच्या आठवणी पण चिरकालपर्यंत आमच्या स्मरणात राहतील. कृपया मला माझ्या अपराधाबद्दल क्षमा करा. मला पूर्ण खात्री आहे तुम्ही माझे अपराध पोटात घालाल. तुमची उणीव आम्हाला सतत जाणवेल.

कृतज्ञतापूर्वक व सस्नेह,

तुमचा धर्म बंधू, तुमचा दास,तुमचा शुभचिंतक व तुमचा मित्र,

**...प्रह्लादप्रिय दास**

–––––––––––––

# झाडाजवळ जप करणारी भक्तीण

## ...गोविंद दासी

*श्रील प्रभुपाद यांच्याबरोबर गोविंद दासी (डावीकडे) व यमुना देवी (उजवीकडे)*




*श्रील प्रभुपाद यांच्याबरोबर सॅन फ्रान्सिस्को येथील दूरदर्शन मुलाखतीच्या वेळी (१९६९)नव नैमिषारण्य, टेक्सास (यु.एस.ए.)*

---

जगदव्यापी कुटुंबातील वैष्णव व वैष्णवींनो,

तुम्हा सर्वांच्या चरणकमळांपाशी माझा दंडवत प्रणाम! आपल्या परमप्रिय श्रील प्रभुपाद यांच्या चरणकमळाशी माझा विनम्र दंडवत प्रणाम! त्यांच्या असीम कृपेशिवाय आपल्यापैकी कोणालाही कृष्णभावनामृताच्या या अद्‌भुत साम्राज्याच्या जवळपास फिरकण्याची सुद्धा संधी मिळाली नसती. अशा या विस्मयकारक व्यक्तिमत्वाचा, ज्यांना आपण प्रेमाने व आदराने श्रील प्रभुपाद म्हणतो, त्यांचा गौरव व जयजयकार असो.

अतिशय खिन्न मनाने व दुःखद अंतःकरणाने मी आपल्या प्रिय गुरुभगिनी यमुना देवी यांच्या देहान्तामुळे झालेल्या वियोगाविषयी माझ्या भावना व्यक्त करू इच्छिते. यमुना देवी या सदोदित शुद्ध कृष्णभावनामृताच्या उत्तुंग दीपस्तंभ

होत्या. त्यांच्या अलौकिक व उत्कृष्ट आवाजात गायिलेल्या गोविंदम् प्रार्थनेद्वारा जगातल्या सर्व इस्कॉन मंदिरातील विग्रहांचे अभिवादन करताना आपण सर्वजण प्रेरित व प्रोत्साहित होतो. ही प्रातःकाळची प्रार्थना आपले परमप्रिय स्वामी श्रील प्रभुपाद यांना परमानंद द्यायची आणि यावरून आपण खात्रीपूर्वक म्हणू शकतो की, भगवान श्रीकृष्ण व त्यांचे दैवी साथी-सोबती यांना पण ही प्रार्थना परमोच्च समाधान देत असणार.

मी यमुना देवी यांना आपले परमप्रिय स्वामी श्रील प्रभुपादांना त्यांच्या या पृथ्वीतलावरील कार्यामध्ये मदत करण्यासाठी अवतरलेली विशेष देवता याच स्वरूपात पाहिले आहे. त्यांची गांभीर्यपूर्ण भक्तिमय चित्तवृत्ती गहन व परमानंदी होती. यमुना देवी श्रील प्रभुपाद यांच्या उत्कट व परमोच्च वृंदावनमय चित्तवृत्तीशी वचनबद्ध व प्रामाणिक राहिल्या. प्रतिष्ठेसाठी खुळ्यासारखी धावपळ तथा नाव, अनुयायी, धन इत्यादी रूपांतील मायेच्या विविध प्रलोभनांनी त्या कधीच विचलित झाल्या नाहीत किंवा आपल्या ध्येयापासून किंचितही ढळल्या नाहीत. श्रील प्रभुपादांनी प्रेरित केलेल्या शुद्ध भक्तिमय चित्तवृत्तीतच त्या सदैव रममाण राहिल्या. त्या हरिनामाचा जप, त्यांच्या नितांत सुंदर राधा कृष्णांच्या विग्रहांची सेवा आणि अंतःकरणापासून कृष्ण भक्तीमध्ये प्रगती यातच तल्लीन असायच्या.

एकदा हवाई इथे असताना मी श्रील प्रभुपाद यांची निरंतर आंतरिक भक्तिमय चित्तवृत्तीविषयी गुणग्राहकता समक्ष पाहिली आहे. व्रज भूमीतून नुकत्याच परतलेल्या एक धर्मभगिनी एका झाडाखाली स्तब्ध बसून भावविभोर अवस्थेत शांतपणे जप करीत होत्या. प्रभुपाद आपल्या खोलीच्या खिडकीपाशी उभे राहून हे दृष्य कौतुकाने न्याहाळत होते. त्यांच्या खोलीत अनेक धर्मबंधूंमध्ये पैसा आणि व्यवस्थापनेविषयी वितंडवाद चालू होता आणि श्रील प्रभुपाद यांना त्याचा न्याय-निवाडा करायचा होता. महत्त्वाकांक्षा व वादविवाद यांसारख्या अनिष्ट प्रवृत्तींचे आक्रमण इस्कॉनच्या नवजात चळवळीमध्ये केव्हाच झाले होते. श्रील प्रभुपाद यांना खिडकीत उभे राहून हवाई बेटाचा निसर्गरम्य देखावा व झाडाखाली एकाकी बसून शांत व हळूवारपणे जपमाळेवर जप करणारी धर्मभगिनी यांना निरखताना मी पाहिले. त्यांनी एक दीर्घ निःश्वास सोडला व ते सौम्यपणे उद्‌गारले, ''हो. हे खरे कृष्णभावनामृत. शांतपणे बसून हरे कृष्ण महामंत्राचा जप करणे. होय, हेच खरे कृष्णभावनामृत!''

यमुना देवी या एक अशाच भक्त होत्या. त्या आपल्या आवडत्या अर्चा

विग्रहांच्या समोर भक्तीमध्ये तल्लीन होऊन एकाग्रतेने व प्रेमपूर्वक जप करायच्या. त्या शुद्ध कृष्णभावनेचा दीपस्तंभ होत्या. त्यांच्या स्वभावात भक्तीमध्ये नाव, प्रसिद्धी, मानमरातब यांसारख्या महत्वाकांक्षांचा लवलेशही नव्हता किंवा त्यांना सत्ता, संपत्ती, अनुयायी यांची अपेक्षा किंवा हाव पण नव्हती. त्या चैतन्य महाप्रभूंनी सुरू केलेल्या व श्रील प्रभुपाद यांनी आपल्यापर्यंत आणलेल्या मूळ भक्तिमय चळवळीच्या पायिक होत्या.

श्रील प्रभुपादांनी यमुना देवी यांचे श्री श्री राधा कृष्ण, चैतन्य महाप्रभू व त्यांचे पार्षद यांच्या नित्य लीलांमध्ये निश्चितच स्वागत केलेले असणार. तिथे एक आनंदमय कीर्तन सुरू असणार आणि सर्वजण त्यांच्या भक्तिमय व शुद्ध सात्त्विक आवाजातील गोडव्याचा मनमुराद आनंद घेत असणार. त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ तिथे एक भव्य महोत्सव साजरा केला जात असणार.

परंतु या मर्त्य जगात आम्ही सर्वजण एका भक्तियुक्त अनमोल रत्नाला मुकलो आहोत. अत्यंत शोकाकुल मनाने आम्ही त्यांच्या वियोगाचे दुःखाश्रू ढाळतो आहोत. आमची एकच इच्छा आहे की कधीतरी, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन, आमच्या वरिष्ठ धर्मभगिनी यमुना देवी यांच्या चरणकमळांना स्पर्श करण्याची संधी आम्हाला लाभू दे.

-------------

# यमुना देवी आणि प्रभुपाद : वाणी व वपू

**...गिरीराज स्वामी**

१९७१ मध्ये श्रील प्रभुपाद अर्ध–कुम्भ मेळ्यासाठी अलाहाबादला गेले होते आणि त्यांच्याबरोबर असलेल्या भक्त–समूहामध्ये मी व यमुना देवी होतो. श्रील प्रभुपादांनी श्रीमद् भागवताच्या सहाव्या स्कंधातील अजामिळाची कथा व पावन हरिनामाविषयी प्रवचन दिले. त्यावेळी भागवताचे फक्त पहिले दोन स्कंध अनुवादित व प्रकाशित झालेले होते. त्यामुळे श्रील प्रभुपादांनी त्यांच्या टीकेसहित असलेल्या संस्कृत भागवतामधून वाचन केले, आणि कधी श्रीधर स्वामी तर प्रसंगी जीव गोस्वामींच्या टीकेचे भाषांतर करीत प्रवचन दिले. तिथे माझ्या ऐकण्यात आले की श्रील प्रभुपाद म्हणाले की, ते यमुना माताजींसाठी बोलत होते. एप्रिल २००७ मध्ये जेव्हा यमुनादेवी मला सांता बार्बारा इथं भेटल्या तेव्हा मी त्यांना त्याविषयी विचारले. त्यांनी मला जे काही सांगितले ते माझ्या हृदयावर कधीही न मिटण्यासारख्या स्वरूपात कायमचे कोरले गेले आहे.

त्यांनी स्पष्टीकरण दिले, त्यांना नेहमी असे वाटायचे की इतर कोणाइतकाच त्यांनाही श्रील प्रभुपाद यांच्या बरोबर चालण्याचा किंवा जवळ बसण्याचा अधिकार होता, आणि सामान्यतः जेव्हा श्रील प्रभुपाद प्रवचन देत तेव्हा त्या व्यासासनाच्या अगदी समोर बसत असत. पण अलाहाबादमध्ये एका संन्याशाने त्यांना समजाऊन सांगितले की भारतात महिला व्यासासनापासून थोड्या दूर बसतात आणि त्यांनी पण हा नियम पाळावा. अर्थातच दुसऱ्या दिवशी सकाळच्या प्रवचनाच्या वेळी त्या त्यांच्या नेहमीच्या जागेवर, प्रभुपादांच्या चरणकमळांपाशी, बसल्या नाहीत.

त्यानंतर थोड्या वेळाने श्रील प्रभुपादांनी यमुनादेवींना त्यांच्या तंबूजवळून जाताना पाहिले व त्यांना हाक मारली, ''यमुना, ये आत ये''. त्यांनी तंबूत प्रवेश केला व प्रभुपादांना दंडवत प्रणाम केला. पण त्या उठण्यापूर्वीच प्रभुपाद म्हणाले, ''तर मग काय, तुमला यापुढे माझी प्रवचने ऐकायची नाहीत का?'' प्रभुपादांची प्रवचने ऐकणे म्हणजे यमुनादेवींना जीव की प्राण होता. प्रभुपादांचे हे उद्‌गार ऐकून त्यांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. प्रभुपादांनी विचारले, ''तू आज सकाळी कुठे होतीस?'' यमुनादेवींनी त्यांना जे काही घडले होते ते जसेच्या तसे सांगितले. प्रभुपाद शांत होते.

यमुनादेवींनी मला सांगितले, तो त्यांच्या आयुष्यातला एक क्रांतिकारक क्षण होता. त्यांना उमजले की त्यांना प्रभुपादांचा सहवास नेहमीच लाभेल असे नाही. तोपर्यंत श्रील प्रभुपाद यांच्यापासून आपल्याला अलग व्हावे लागेल ही कल्पनाच त्यांच्या मनाला कधी शिवली नव्हती. १९६७ साली प्रभुपादांना हृदाविकाराचा झटका आला होता तेव्हा सर्व भक्तांनी रात्रभर त्यांच्यासाठी जप केला होता आणि त्यामुळेच प्रभुपादांची प्रकृती सुधारली होती. प्रत्येक गोष्टीसाठी सारे भक्त त्यांच्यावर इतके विसंबून होते की, प्रभुपाद त्यांच्या बरोबर नसतील ही कल्पनाच त्यांच्या मनाला कधी शिवलीसुद्धा नव्हती. पण त्यांनी मला सांगितले की, प्रत्येक भक्ताला हे मनोमन उमगले पाहिजे की, कधी न कधी प्रभुपाद आपल्यात नाहीत अशी वेळ निश्चित येणार आहे आणि यमुनादेवींच्या बाबतीत अशी जाणीव येण्याचा क्षण अलाहाबादमध्ये त्यांचे त्या संन्यासी व श्रील प्रभुपादांशी बोलणे झाल्यानंतर आला.

त्यांच्या तंबूत बसलेल्या असताना यमुनादेवींनी श्रील प्रभुपादांना विचारले, ''तुम्ही तुमच्या गुरुमहाराजांबरोबर किती वेळ व्यतीत करू शकला होता?'' ''फारच मोजक्या प्रसंगी, फार फार तर पाच-सहा वेळा''. श्रील प्रभुपाद म्हणाले, ''पण ते प्रसंग अत्यंत जिव्हाळ्याचे होते. आम्ही एकत्र फिरत असू आणि खूप विषयांवर चर्चा करत असू''. त्यानंतर ते म्हणाले, ''ज्यांची अशी धारणा आहे की, आध्यात्मिक गुरूंचा सहवास हा केवळ शारीरिक पातळीवरच असतो, ते राजाच्या मांडीवर बसलेल्या डांसापेक्षा किंचितही वेगळे नाहीत. डांसाचे काम काय? केवळ रक्त शोषणे, मोठे मोठे संन्यासी असलेल्या माझ्या कितीतरी धर्मबंधूंनी असाच विचार केला आणि त्यांनी फक्त रक्तच शोषले''.

प्रभुपादांच्या या शब्दांनी यमुनादेवींना नवी बळकटी आली. त्या क्षणापासून त्यांनी खूणगाठ बांधली की, श्रील प्रभुपादांपासून दूर राहून त्यांच्याबरोबरचे नाते व त्यांची सेवा यांचा सारासार विचार केला पाहिजे. त्यांनी वाणी व वपू (प्रत्यक्ष सान्निध्य) यांचा सखोल विचार करण्यास सुरुवात केली आणि त्यांना त्याविषयी अधिकाधिक सूक्ष्मदृष्टी प्राप्त झाली. पण त्यांच्या म्हणण्यानुसार, ''वपू म्हणजे अत्यंत अथांग व गंभीर अशी बाब आहे. एरव्ही वरकरणी तुम्ही तेच शब्द ऐकले असता, पण प्रभुपादांच्या प्रत्यक्ष सहवासात असणे हा एक वेगळाच व अनोखा अनुभव आहे''. त्यांच्यापासून दूर असतानाही प्रत्यक्ष त्यांच्याजवळ असण्याची अनुभूती ही आगळीच आहे. श्रील प्रभुपाद हे

एक दिवस हे जग सोडून जाणार आहेत या कटू सत्याचा उलगडा आणि स्वीकार हे माझ्यासाठी जीवनातील एक निर्णायक वळण होते. ''ते एक वृद्ध गृहस्थ आहेत, ते एक ना एक दिवस हे जग सोडून जाणार आहेत आणि मला त्यासाठी मानसिक तयारी केली पाहिजे''. यमुनादेवींना आता समजून चुकले होते की, त्या क्षणापासून त्यांना हे कटू सत्य झेलण्याची मानसिक तयारी करावी लागणार आहे.

''तर श्रवणाविषयी कहाणी ही अशी आहे'', त्या म्हणाल्या, ''प्रभुपाद म्हणाले, 'मी बोलतो कारण तुला ऐकायला खूप आवडते. मी इतकं बोलतो कारण तुला ऐकायला पण तितकेच आवडते'. ''माझी श्रवणाविषयीची भूक मी कधी प्रभुपादांपाशी व्यक्त केली नाही. तरीपण त्यांनी ती मनोमन जाणली होती''. यमुनादेवींच्या म्हणण्यानुसार श्रील प्रभुपादांना प्रत्येक भक्ताची आंतरिक चेतना व त्यांच्या सेवाभावाचे बाह्य प्रकटीकरण यांविषयी संपूर्णपणे जाण होती.

वाणी व वपू हा यमुनादेवींच्या जीवनातील एक प्रमुख विषय बनून राहिला होता. प्रभुपादांच्या वाणीच्या माध्यमातून त्यांच्याशी आपले नाते, त्यांच्या प्रत्यक्ष सहवासाच्या – अत्यंत जवळीक असलेल्या प्रत्यक्ष सहवासाच्या – नात्याइतकेच सबल व तितक्याच तीव्रतेने कसे जोपासायचे याचा त्यांना ध्यास लागता होता. त्यांची खात्री पटलेली होती की, हे सहज शक्य होते, आणि त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य असे आखून घेतले की त्यांना प्रभुपादांचे मार्गदर्शन व कृपा सतत मिळत राहिली व पर्यायाने त्यांना प्रभुपादांचे सान्निध्य पण मिळत राहिले.

२० डिसेंबर रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास यमुनादेवींच्या सततच्या सोबती व आध्यात्मिक विश्वस्त, दीनतारिणी दासी यांना आढळून आले की यमुना देवी या जगातून निघून गेल्या होत्या. त्यांचा हात जपमाळेच्या पिशवीतच होता आणि त्यांच्या चेहऱ्यावर मंदहास्य विलसत होते. मृत्युसमयी त्या अतिशय शांत व आनंदी होत्या. त्यांना मृत्यूचे भय कधीच वाटले नाही. यमुनादेवींना प्रबळ विश्वास होता की त्या पुन्हा प्रभुपादांच्या बरोबर असतील किंवा कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्या प्रभुपादांच्या चळवळीमध्ये सेवेत गुंतलेल्या असतील. श्रील प्रभुपादांच्या सेवेसाठी जो कोणी आपले उभे आयुष्य वेचतो त्याला किंवा तिला अशी कर्मगती लाभते.

यमुना देवी हे एक देखणे व्यक्तिमत्व होते, त्या श्रील प्रभुपाद यांच्या व त्यांच्या प्रचार कार्याच्या तथा भगवंतांच्या अलौकिक सेवक होत्या. त्यांनी आपल्या व्यक्तिगत उदाहरणाने नाम रुची (पावन हरिनामाविषयी गोडी), जीव दया (जीवात्म्याविषयी करुणा) व वैष्णव सेवा (भक्तांची सेवा) हे वैष्णव आचरण सिद्ध केले. त्या माझ्यासारख्या अनेकांसाठी सदुपदेशक, मार्गदर्शक व सन्मित्र होत्या. आम्हाला त्यांच्या व्यक्तिगत सहवासाची उणीव नेहमीच भासेल. तथापि, त्यांच्या वियोगात सुद्धा, त्यांनी जे आदर्श प्रिय मानले त्यांचा पाठपुरावा करण्याचा आम्ही मनोभावे प्रयत्न करू.

----------------

# अलाचुआ येथील शोकसभेत यमुना देवी यांना भक्तांची श्रद्धांजली

**...माधव स्मूलन**

अलाचुआ (फ्लोरिडा) येथे मंगळवार दिनांक २७ डिसेंबर २०११ रोजी इस्कॉनमधील एक अग्रेसर नेत्या, प्रमुख सुगरण, प्रेमळ मित्र व मार्गदर्शक यमुना देवी यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या शोकसभेला सुमारे २०० भक्त उपस्थित होते.

इस्कॉनच्या प्रत्येक मंदिरात रोज सकाळी ध्वनिक्षेपित केल्या जाणाऱ्या 'गोविंदम्' प्रार्थनेच्या गायिका म्हणून यमुना देवी सुप्रसिद्ध होत्या, तसेच त्या सॅन फ्रान्सिस्को व लंडन इथे कृष्णभावनामृताचा शुभारंभ करण्यासाठी पण प्रसिद्ध होत्या. कमजोर व क्षीण हृदयाच्या इलाजासाठी सन २०११ च्या सुरुवातीचे तीन महिने त्यानी मुंबईच्या भक्तिवेदांत इस्पितळात व्यतीत केले होते. त्यांच्या प्रकृतीत थोडीफार सुधारणा झाल्यासारखे वाटले. पण काही काळानंतर हृदयाच्या नवीन गुंतागुंतीमुळे, त्यांचे त्यांच्या मेलबोर्न फ्लोरिडा येथील समुद्रकिनाऱ्यावरील आश्रमात, २० डिसेंबर २०११ रोजी सकाळी निधन झाले त्यावेळी त्यांचे वय ६९ वर्षे होते.

यमुना देवींचे परमप्रिय विग्रह राधा-वनबिहारी यांचा प्राकट्य दिवस १४ डिसेंबरला येतो. यमुना देवी हा दिवस नेहमीच मोठ्या थाटामाटात साजरा करत. त्यानंतर काही दिवसातच हे घडले. यमुना देवींच्या मैत्रीण निर्मला दासी म्हणाल्या, ''काही भक्त १९ डिसेंबरच्या रात्री सुद्धा त्यांच्याबरोबर होते, आणि त्या रात्री त्यांनी छान कीर्तन केले. यमुना देवींच्या छातीत किंचित दुखत होते, पण थोड्या वेळाने वेदना कमी झाल्या आणि त्यांना झोप लागली दुसऱ्या दिवशी सकाळी ६च्या सुमारास त्यांची जिवलग व विश्वासू मैत्रीण दीनतारिणी यांनी यमुनादेवींच्या खोलीत डोकावून पाहिले तर पहाटेच्या पावन ब्रह्म-मुहूर्तादरम्यानच यमुना देवींचा प्राण निघून गेला होता. त्या जपमाळेच्या पिशवीत हात असलेल्या अवस्थेत झोपलेल्या होत्या. त्यांचा चेहरा शांत व प्रसन्न होता. ते दृष्य अतिशय विलोभनीय व मंगलदायी होते.

२२ डिसेंबर २०११ रोजी यमुना देवींचा दहनसंस्कार मेलबोर्न येथील स्मशान भूमीत करण्यात आला. तिथल्या कर्मचाऱ्यांनी दीनतारिणी व त्यांची

अन्य एक मैत्रिण श्रृतीरूपा दासी यांना यमुना देवींचा देह तिलक, नवीन वस्त्रे व गंगाजल यांनी शुचिर्भूत करण्याची अनुमती दिली. यमुना देवींच्या बरोबर १९६० साली लंडनला गेलेली त्यांची जिवलग मैत्रीण मालती दासी, रंगावती, कर्तमासा व राधा इत्यादी माताजी यमुना देवींच्या अंत्यसंस्काराच्या वेळी उपस्थित होत्या.

२२ डिसेंबरला यमुना देवींचा दहनसंस्कार झाल्यानंतर जगभर त्यांच्या स्मरणार्थ अनेक शोकसभा आयोजित केल्या गेल्या. २७ डिसेंबर २०११ रोजी अलाचुआ इथली शोकसभा त्यांपैकीच एक होती.

या शोकसभेसाठी अलाचुआ समाजमंदिराची एक खोली कुंड्यांमधली सुंदर झाडे व विविध फुलांनी सजवली होती. सौम्य प्रकाश व्यवस्था केलेली होती. श्रील प्रभुपाद, यमुना देवी व त्यांचे अर्चाविग्रह राधा वनबिहारी यांच्यासमोर मेणबत्त्या मंदपणे तेवत होत्या. या प्रसंगाने अलाचुआ समाजाच्या सर्वांना एकत्रित बांधले होते. वरिष्ठ भक्त व नव्या पिढीचे तरुण भक्त आपल्या प्रेमळ मित्र व स्फूर्तीदेवता असलेल्या यमुना देवींना आदरांजली वाहण्यासाठी त्या खोलीत जमले होते. सर्वांची मनःस्थिती एखाद्या नैसर्गिक आपत्तीनंतर निर्वासित शिबिरातल्या लोकांची असते तशी होती.

त्यांच्या ज्या आठवणी त्या रात्री भक्तांनी सांगितल्या व त्यांच्या जवळच्या लोकांच्या मुलाखती यामधून यमुना देवींचे व्यक्तिगत आयुष्य, त्यांचे प्रवाही जीवन, परिपूर्ण व परिपक्व व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा अनेकानेक भक्तांच्या जीवनावर झालेला परिणाम यांचे एक सलग व सुंदर चित्र उभे राहते.

## ओरेगॉन व सॅन फ्रान्सिस्को इथले सुरुवातीचे दिवस

यमुना देवींचा जन्म ओरेगॉन इथे १९ मे १९४२ रोजी झाला. प्रभुपादांचे अनुयायी श्यामसुंदर दास (यमुना देवींसह ज्या भक्तांनी इंग्लंडमध्ये इस्कॉनची सुरुवात केली त्या सहा अग्रणी भक्तांपैकी एक) हे या शोकसभेत स्काईपच्या माध्यमातून (फोनवर) बोलले. त्यांनी पाचव्या इयत्तेत असताना त्यांची व यमुना देवींची प्रथम भेट कशी झाली ते सांगितले. अर्थात त्यावेळी ते सॅम स्पीर्स्त्र व त्या जोन केम्पनेल्ला होत्या.

‘‘वेण्यांच्या दोन शेपट्या घातलेली ही छोटीशी मुलगी वर्गात आली आणि माझ्या पुढेच बसली. मला तिची वेणी ओढल्यावाचून राहवेना.’’ त्यांनी सांगितले, ‘‘मी तिची एक वेणी हळूच ओढली आणि ती किंचाळली. त्याबद्दल

शिक्षकानी तिची कानउघाडणी केली. पण तेव्हापासून आम्ही दोघे अतिशय विशेष मित्र बनलो. आम्हा दोघांनाही विनोदबुद्धी होती, त्याचबरोबर अंतिम सत्याचा शोध हे पण आमचे समायिक ध्येय होते''.

लॉस एंजेलिसच्या रस्त्यावरच्या प्रवासात या दोघांनी एकमेकांना गोष्टी सांगितल्या, खुळ्यासारख्या कविता रचल्या व त्याचबरोबर ते जीवनाच्या अर्थाविषयी पण बोलले. जोन व सॅम या निर्णयाप्रत पोहोचले की त्यांना असा एक गुरू हवा आहे की जो त्यांना जीवनाविषयी खरी वस्तुस्थिती सांगू शकेल. कालांतराने या दोघांना एकमेकांशेजारची घरे मिळाली आणि त्यामुळे सत्याच्या शोधाविषयी ते सतत बोलू शकत असत.

त्यांची ही तीव्र इच्छा लवकरच फलस्वरूप झाली. सॅम अमेरिकन जंगल खात्यात सेवा करत होता आणि जंगलातील एका निर्जन स्थळी टेहळणी करण्यासाठी उभारलेल्या मनोऱ्यावरून जंगलातील वणव्याची खबर देण्याचे काम करत होता. सॅम बरोबर त्याची मैत्रीण नगेल (नंतरची मालती दासी) ही पण रहात होती. कित्येक आठवडे कोणाचेही दर्शन न झाल्यानंतर एके दिवशी त्यांना एक मोटर गाडी त्यांच्याकडेच येताना दिसली. गाडीच्या खिडकीतून धापा टाकणारा 'जॉनी' डोकावला, त्याच्या सोबत मायकेल ग्रँट व त्याची मैत्रीण जान (मुकुंद व जानकी) हे दोघे होते. त्या दोघांनी सॅम व मेलेनी यांना त्यांना नुकत्याच भेटलेल्या एक आध्यात्मिक स्वामीविषयी सांगण्यास सुरुवात केली.

''माझा यमुना देवीवर खूप विश्वास होता कारण त्या अत्यंत बुद्धिमान व सारासार विचार करणाऱ्या होत्या आणि अशा आध्यात्मिक गुरूंचा व त्यांचा परिचय होणेच त्यांच्या बाबतीत पुरेसे होते याविषयी माझी खात्री पटली''. श्यामसुंदर म्हणाले, ''तिथल्या तिथेच व तत्क्षणीच मी त्यांना सॅन फ्रान्सिस्को इथे मंदिर उभारण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे मनोमन ठरविले''.

आणि अशा प्रकारे यमुना देवी व गुरुदास, श्यामसुंदर व मालती आणि मुकुंद व जानकी या सहा जिवलग मित्रांचा व इस्कॉनच्या अग्रेसर भक्तांचा एक छोटासा पण समर्पित गट तयार झाला. या सर्वांनी मिळून सॅन फ्रान्सिस्को मधील हेट एशबरी या दुकानाशेजारीच इस्कॉनचे जगातले दुसरे मंदिर सुरू केले.

मुकुंद गोस्वामी या शोकसभेला उपस्थित नव्हते पण ते इस्कॉन वृत्तसेवेशी

हल्लीच बोलले. ते यमुना देवींना १९६१ साली पोर्टलँड, ओरेगॉन इथे एका मित्राबरोबर पहिल्यांदा भेटले. त्यावेळी यमुना देवी रीड महाविद्यालयात लॉइड रेनॉल्ड्स यांच्याकडून कलात्मक अक्षरलेखन शिकत होत्या. लॉइड रेनॉल्ड्स यांनी ॲपलचे संस्थापक स्टीव्ह जॉब्ज यांना पण कलात्मक अक्षरलेखन शिकवले होते.

‘‘त्या नात्याने माझ्या मेहुणी (बायकोची बहिण) होत्या. त्यामुळे त्या आमच्या कुटुंबातीलच एक होत्या’’. मुकुंद गोस्वामीनी आम्हाला सांगितले, ‘‘मी त्यांना नेहमी माझ्या आईप्रमाणे मानले. मी त्यांना कधी स्त्री किंवा पुरुष या दृष्टिने पाहिलेच नाही. तथापि, त्यांच्यामध्ये चांगल्या वैष्णवीचे सारे गुण होते हे मात्र नक्की. आमच्या दोघांचे सूर चांगले जुळायचे. माझे त्यांच्याशी कधी भांडण झाल्याचे मला मुळीच आठवत नाही. त्या खऱ्या अर्थाने संत होत्या’’.

सुप्रसिद्ध ‘‘मंत्रा रॉक नृत्य’’ आयोजित करण्यात आले होते तेव्हा यमुना देवी या इस्कॉनच्या सॅन फ्रान्सिस्को मधील मंदिरातील एक प्रमुख प्रेरणास्रोत होत्या. अवालॉन बॉलरूममध्ये आयोजित केलेल्या या नृत्योत्सवात श्रील प्रभुपादांनी स्वतः भाग घेतला होता आणि कार्यक्रमात दि ग्रेटफुल डेड, जानिस जापलिन, मोबी ग्रेप इत्यादी मंडळींचा सहभाग होता.

‘‘यमुना देवी व गुरुदास जयानंद यांच्या पूर्वीच्या घरी रहात होते. हे घर ‘दि ग्रेटफुल डेड’ यांच्या घराच्या अगदी समोरच होते,’’ मुकुंद गोस्वामी म्हणाले, ‘‘यमुना देवी तेव्हा एक उत्कृष्ट सुगरण म्हणून ओळखल्या जात होत्या आणि त्या बऱ्याच भक्तांसाठी स्वयंपाक बनवत असत. विशेषतः त्यांची आंबट मलाइमधली ‘स्वर्गीय केळी’ (Celestial Bananas) सर्वांना खूप आवडायची’’.

## इंग्लंड मधील पुढाकार आणि हृदयाला भिडणाऱ्या गोविंदम्‌चे गायन

मुकुंद महाराज यांच्या स्मृतीकोषात यमुना देवी यांनी ‘नामांकित सहा’ व अग्रणी धर्मप्रचारकांपैकी एक म्हणून इंग्लंडमध्ये कृष्णभावनामृत प्रस्थापित करण्यासाठी १९६८ साली जी भटकंती केली होती तेव्हाच्या काही मधुर आठवणी होत्या.

‘इंग्लंडमध्ये आमचे आगमन झाल्यानंतर काही महिन्यांनी हॅरो हिल भागातील एका धनाढ्य गृहस्थांच्या इस्टेटीवर एका वेषभूषा (costume) पार्टीसाठी आम्ही निमंत्रित म्हणून गेलो होतो. सर्वांच्या मते आमची भक्तांची

वेषभूषा सर्वात उत्तम व आकर्षक होती.'' ते पुढे म्हणाले, ''यमुनादेवींनी प्रचाराची ही संधी मुळीच दवडली नाही. काही वेळातच मी पियानो वाजवू लागलो आणि यमुनादेवींनी आपल्या मधुर आवाजात, आकाशाच्या निळाईसारखी मुलायम व हृदयाला भिडणारी, 'हरे कृष्ण' धून गाण्यास सुरुवात केली. काही वेळातच आमच्या भोवती जवळपास पन्नास श्रोत्यांचा गराडा पडला. अंततः तो कार्यक्रम संपला तेव्हा आमच्याबरोबर सुमारे चारशे लोकांनी हरे कृष्ण महामंत्राचे कीर्तन केले होते.

१९६९ साली जून महिन्यात यमुना देवी, गुरुदास व त्यांचे बाकीचे चार शिलेदार इंग्लंडमधील इस्कॉनच्या पहिल्या मंदिराच्या जागी बरी प्लेस इथं दाखल झाले. त्यानंतर लवकरच यमुना देवींनी हरे कृष्ण महामंत्राचे ध्वनिमुद्रण एचख स्टुडिओमध्ये केले व त्या ध्वनिमुद्रिकेचे सप्टेंबर महिन्यात प्रकाशन केले. अगदी थोड्याच अवधीत ती ध्वनिमुद्रिका संपूर्ण जगभरात प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचली.

''ती ध्वनिमुद्रिका मँचेस्टरच्या विशाल स्टेडियमवरील सॉकरच्या सामन्यांच्या मध्यांतरातही वाजवली जायची,'' मुकुंद गोस्वामी म्हणाले, ''मद्याने बेधुंद झालेले मँचेस्टर युनायटेडचे हजारो सॉकर शौकीन यमुनादेवींसमवेत 'हरे कृष्ण महामंत्र'' गात होते''.

१९७१ साली जानेवारी महिन्यात यमुना देवी यांच्या मुख्य सुरात व जॉर्ज हॅरिसन यांच्या साथीत गोविंदम्‌चे ध्वनिमुद्रण केले गेले. त्या ध्वनिमुद्रिकेची 'वंशावळ' माहीत असूनही इस्कॉन लॉस एंजेलिसच्या नेत्यांनी त्यांची अपरिपक्वता दाखविली आणि केवळ त्या ध्वनिमुद्रिकेत एका महिलेचा आवाज आहे म्हणून त्यांनी ती ध्वनिमुद्रिका श्रील प्रभुपादांसाठी वाजविण्यास नकार दिला.

एके दिवशी सकाळी सातच्या सुमारास श्रील प्रभुपाद मंदिराच्या सभागृहात व्यासासनावर बसलेले होते आणि श्री श्री राधा रुक्मिणीच्या शृंगार दर्शनासाठी पडदा उघडण्याची वेळ झालेली होती. श्रील प्रभुपादांनी ते 'गोविंदम्' ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. पण त्या वेळी सुद्धा नव द्वारका मंदिराच्या नेत्यांनी ते गीत वाजवण्यास प्रतिकार केला. त्यांचे म्हणणे होते आपल्याला हे भजन खाजगीरित्या ऐकण्यासाठी वेगळ्या उपकरणाची आवश्यकता आहे. नाहीतर मंदिराच्या ध्वनिक्षेपण यंत्रणेवरून प्रसारित केल्यास ते मंदिरातले विग्रह व अन्य सर्वांच्या कानावर पडेल.

जेव्हा श्रील प्रभुपादांनी फारच आग्रह धरला तेव्हा त्यांनी ते भजन वाजविले. यमुना देवींच्या सुस्पष्ट व भक्तिरसाने ओतप्रोत अशा आवाजात 'गोविंदम् आदि पुरुषम् तम अहम् भजामी'चे सूर आळवू लागले आणि त्याचबरोबर अर्चाविग्रहांच्या वेदीवरचे उदबत्त्यांच्या धुराचे सफेद ढग हळूवारपणे खाली उतरले आणि मंदिराच्या सभाग्रहात मुक्तपणे दरवळू लागले.

''सारे भक्त चिंतातूर होऊन श्रील प्रभुपादांच्या प्रतिक्रियेची वाट पहात होते.'' मुकुंद महाराज म्हणाले, ''पण त्यांचे डोळे मिटलेले होते आणि ते एक शब्दही उच्चारत नव्हते. असेच आणखी काही चिंताक्रांत क्षण गेल्यानंतर साऱ्या भक्तांना दिसले की श्रील प्रभुपादांच्या गालावरून घळघळा अश्रू वहात होते. आता श्रील प्रभुपादांकडून यापेक्षा आणखी वेगळ्या प्रतिक्रियेची गरजच नव्हती. आणि अशा प्रकारे या वादावर कायमचा पडदा पडला''.

त्यानंतर थोड्याच वेळात श्रील प्रभुपादांनी तिथे उपस्थित असलेल्या सर्व भक्तांना सांगितले की, गोविंदम्चे हे ध्वनिमुद्रण जगातल्या सर्व मंदिरांमध्ये अर्चाविग्रहांच्या शृंगार दर्शनाच्या वेळी वाजविले जावे. तेव्हापासून आजतागायत 'गोविंदम्' प्रत्येक मंदिरातील सकाळच्या कार्यक्रमाचा अत्यावश्यक भाग बनून राहिले आहे. २००९ च्या हिवाळी ऑलिंपिक स्पर्धेच्या वेळी दोन अमेरिकन व्यायामपटूंनी 'फिगर आइस स्केटिंग' प्राविण्य स्पर्धेच्या वेळी आपले नृत्यकौशल्य दाखविताना गोविंदम्च्या या ध्वनिमुद्रणाचा वापर करून बर्फावरील नृत्य सादर केले. त्यांचे हे कर्तब जगभरातल्या लक्षावधी प्रेक्षकांनी दूरदर्शनवर पाहिले आणि गोविंदम्ला लाख लाख श्रोत्यांच्या पसंतीची आणखीन एक पावती मिळाली.

## श्रील प्रभुपादांबरोबर भारत भ्रमण

इस्कॉनच्या भारतातील आरंभीच्या काळात, प्रत्येक बाबतीत नेहमीच हिरीरीने पुढाकार घेणाऱ्या यमुना देवी श्रील प्रभुपादांबरोबर दोन वर्षे भारतभर फिरल्या. या काळात आणि एकूण आठ वर्षापर्यंत त्यांनी श्रील प्रभुपादांच्या व्यक्तिगत स्वयंपाक्याची सेवा केली. त्यांची ही पाक-सेवा नंतर विश्वविख्यात झालेल्या त्यांच्या पाककौशल्याचा पायाच बनला असे म्हणावा लागेल.

१९९६ साली अलाचुआ परिषदेत यमुनादेवींच्याच आवाजात ध्वनिमुद्रित केलेल्या ऑडिओ क्लिपद्वारे त्यांच्या या आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यांनी सांगितलेली एक अविस्मरणीय आठवण अशी आहे : एकदा

आगगाडीने प्रवास करत असताना गाडीच्या स्वयंपाकाच्या डब्यात प्रभुपादांना चालण्यासारखा एकही पदार्थ नव्हता, म्हणून यमुना देवींनी स्वयंपाकाच्या डब्यातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वयंपाकगृहात श्रील प्रभुपादांसाठी भात शिजविण्याची अनुमती मागितली. त्या कर्मचाऱ्यांनी नकार दिला, तेव्हा त्या उत्तरल्या, ''माझ्या गुरुमहाराजांना भात हवा आहे आणि मी तो शिजविणारच. पण जर तुम्ही मला तसे करू दिले नाहीत, तर मात्र मी चालत्या गाडीतून खाली उडी टाकेन.''

यमुना देवी खरोखरीच गंभीर होत्या. त्यांना श्रील प्रभुपादांच्या समोर रिकाम्या हाताने जायचे नव्हते आणि गाडीच्या कर्मचाऱ्यांना ते पूर्णपणे कळून चुकले होते आणि म्हणूनच त्यांनी यमुना देवींना 'वेडसर गोरी मड्डम' म्हटले. तरी त्यांना स्वयंपाकगृहात प्रवेश करू दिला. त्यांनी भटारखान्यातले एक मोठे व जागोजागी चेपलेले भांडे काळजीपूर्वक स्वच्छ केले आणि त्याच्या तळाशी इवलासा भात शिजविला. ही एक मामुली बाब होती पण जेव्हा त्यांनी तो भात श्रील प्रभुपादांना सादर केला तेव्हा त्यांना मनोमन खूप आनंद झाला आणि तो त्यांच्या विशिष्ट लकबीने डोळे विस्फारण्यावरून दृगोच्चर होत होता.

यमुनादेवींचे श्रील प्रभुपादांच्या बरोबर एक अतिविशिष्ट व कित्ता गिरविण्यासारखे नाते जोडलेले होते. त्यांच्या या उदाहरणाने अनेकांना प्रेरणा व स्फूर्ती दिली आहे व यापुढेही देत राहील. या शोकसभेत बोलताना कौशल्या देवींनी भारतात प्रवास करताना त्यांना यमुना देवींनी कसे आपल्या पंखाखाली घेतले व त्यांच्या श्रील प्रभुपादांशी असलेल्या नात्याचा कसा परिचय करून दिला, याविषयी सांगितले.

''यमुना देवी श्रील प्रभुपादांशी अतिशय प्रेमपूर्वक व व्यक्तिगत स्वरूपात वागायच्या आणि मी त्यांच्याकडून खूप काही शिकले.'' कौशल्या देवी म्हणाल्या, अशाच एका प्रसंगी यमुनादेवींनी कितीतरी दुकाने धुंडाळली आणि महत्प्रयासाने शोधलेल्या बुटांची एक जोडी प्रभुपादांच्या पायाजवळ ठेवत त्या म्हणाल्या, ''प्रभुपाद ही जोडी तुमच्या सुंदर पदकमळांसाठी आहे!''

याची परतफेड म्हणून श्रील प्रभुपाद यमुना देवींची खूप काळजी घ्यायचे. खरं तर ते सर्व महिला भक्तांची नेहमीच काळजी घ्यायचे. भारतात कोठेही प्रवास करताना या समूहातल्या यमुना देवी व कौशल्या देवी या महिला भक्त नेहमी मोटर गाडीने प्रवास करीत असत, तर बाकी भक्त रिक्षाने जायचे. जर

एखाद्या मुक्कामाच्या ठिकाणी केवळ दोनच खोल्या उपलब्ध असतील तर त्या दोघींना स्वतंत्र खोली मिळेल याची प्रभुपाद खातरजमा करत असत आणि बाकी भक्त बाहेरच्या पटांगणात तंबूमध्ये झोपत असत.

## व्यक्तिगत आस्थेचे मूर्तिमंत उदाहरण

यमुना देवींनी आपल्या कृपाछत्राखाली घेतलेल्या कौशल्या देवी या काही एकट्याच भक्त नव्हत्या. कितीतरी भक्तांनी सांगितले की यमुना देवींच्या स्वरूपात कृष्णभावनामृतातल्या आरंभीच्या काळात त्यांना एक अत्यंत परिणामकारक परिचयकर्ता व त्याहीपेक्षा एक प्रेरणादायी मार्गदर्शक लाभला. जॉर्ज हॅरिसनच्या ''आणि सूर्य उगवला'' या आत्मचरित्राचे लेखक योगोश्वर दास यांनी पण हेच सांगितले की, यमुना देवी या त्यांना भेटलेल्या पहिल्या वाहिल्या भक्त होत्या आणि ते १९ वर्षांचे होते तेव्हा यमुनादेवींनी त्यांना आपल्या पंखाखाली घेतले होते.

देवर्षी दास यांनी सुद्धा ते भक्तीत नवीन असताना यमुनादेवींनी त्यांची कशी काळजी घेतली होती ते वर्णन केले, ''माझ्यासाठी यमुना देवी कृष्णभावनामृतातल्या जीवश्च कंठश्च मित्र होत्या.'' ते म्हणाले, ''एखाद्याची आस्थापूर्वक व्यक्तिगत काळजी कशी घ्यावी याचे त्या अत्युत्कृष्ट व मूर्तिमंत उदाहरण होत्या. प्रत्येकाला त्यांच्याकडून भरभरून प्रेम मिळायचे, त्या प्रत्येकाची मनोभावे काळजी घेत आणि प्रत्येकाला अंतःकरणापासून पुरेपूर प्रतिसाद देत असत.''

देवर्षी दास यांची पत्नी, निर्मला दासी, यमुना देवींना नव वृंदावनमध्ये १९८५ साली भेटल्या. पुढे त्यांनी यमुनादेवींची खूप काळजी घेतली. त्या म्हणाल्या, ''प्रभुपादांच्या निर्वाणानंतर मी त्यांचे सान्निध्य अनुभवले असेल तर ते केवळ यमुनादेवींच्या स्वरूपातच.''

भारतभर भ्रमण करताना आणि श्रील प्रभुपादांची व्यक्तिगत स्वयंपाकी म्हणून सेवा करताना कृष्णप्रसाद बनविण्याविषयी त्या जे काही शिकल्या होत्या ते त्यांनी, १९८० च्या सुमारास एका मोठ्या पुस्तकाच्या स्वरूपात संकलित करण्यास सुरुवात केली. त्यांच्या शोकसभेत योगेश्वर दास यानी सांगितले की, ज्या ज्या प्रकाशकाकडे ते पुस्तक प्रकाशनासाठी दिले त्यांनी ते 'फारच मोठे आहे' म्हणून साभार परत केले. परंतु यमुनादेवींनी त्या पुस्तकात किंचितही काट-छाट करण्यास साफ नकार दिला. त्या म्हणाल्या, ''जेव्हा तुम्ही श्रील

प्रभुपादांसाठी कोणतेही कार्य करता तेव्हा काहीही हातचे राखून ठेवण्यात अर्थ नसतो. तुमचे सर्वस्व झोकून देऊन काम करा''.

## अखेरची वर्षे

या साऱ्या प्रवासात एक भक्त सातत्याने यमुनादेवींच्या खांद्याला खांदा लावून त्यांना व त्यांच्याकडे आलेल्या अन्य भक्तांना नैतिक बळ व प्रोत्साहन देत राहिल्या. त्या म्हणजे दीनतारिणी माताजी. श्रील प्रभुपाद म्हणाले, ''तुम्हा दोघींचा समन्वय व साथ खूप छान आहे. तुम्ही दोघी असेच नेहमी एकत्र काम करीत रहा.'' या दोघींची मैत्री १९७५ मध्ये यमुनादेवींचे पती गुरुदास यांनी संन्यास घेतला तेव्हा जुळली आणि त्यानंतर ३७ वर्षे त्या दोघी एकत्र राहिल्या व सातत्याने सेवा करीत राहिल्या.

त्यानंतर या दोघींनी ब्रिटिश कोलंबियामधील शरणागती या कृषीक्षेत्रामध्ये कडब्याच्या पेंढ्यांचा आश्रम स्वकष्टाने बांधला आणि या दोघी तिथल्या स्थानिक उत्पन्नावरच गुजराण करीत १९९९ पासून ते २०१० पर्यंत तिथे राहिल्या. इथे राहून त्यांनी राधा वनबिहारीची भक्तिमय सेवा तर केलीच शिवाय इस्कॉनच्या तरुण भक्तांना प्रोत्साहित केले.

''आपल्या अंतिम वर्षांमध्ये युवक हेच यमुनादेवींचे मुख्य उद्दिष्ट होते. मग ती शरणागती आश्रमातली मुले असोत, 'कृष्ण-संस्कृती' बस दौऱ्यावरील तरुण मुलांना भेटणे असो किंवा माझी सहा वर्षांची मुलगी वाणी हिला पाककला शिकविणे असो.'' निर्मला दासी म्हणाल्या, ''यमुनादेवींना नेहमी वाटायचे आपली व युवकांची खऱ्या अर्थाने नाळ जुळली होती आणि त्यांना कृष्णाशी जुळलेली अशी मुलेच अधिक आवडत असत.

कदाचित यमुनादेवींना कीर्तनाविषयी वाटणारे प्रगाढ प्रेम हाच त्यांना व युवकांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा होता.

''त्या अतिशय विनम्र होत्या आणि त्यांना प्रत्येकाने कीर्तनात सहभागी झालेले आवडायचे. त्या क्वचित प्रसंगीच कीर्तनात पुढाकार घ्यायच्या. गोलाकार बसून आळीपाळीने एकामागून एक असे गाण्यासाठी त्या सर्वांना निमंत्रित करीत असत.'' निर्मला दासी म्हणाल्या.

त्यांच्या या रोजच्या प्रघाताचा आदर राखण्यासाठी यमुना देवींच्या अलाचुआ येथील शोकसभेत सुधर्म दासी यांनी मायक्रोफोन एकेकाकडून दुसऱ्याकडे असा क्रमाक्रमाने फिरवत ठेवला. जेणेकरून त्या खोलीतील

प्रत्येकजण यमुना देवींविषयी चार शब्द बोलू शकेल. त्यांच्याविषयी सर्वांचे प्रेम सूर्यप्रकाशासारखे स्वच्छ व स्पष्ट होते. विविध वयोमानाच्या आणि विविध पार्श्वभूमीवरच्या लोकांवर त्यांचा प्रभाव अचाट, अफाट व मन हेलावणारा होता. यमुनादेवींची पाकशास्त्रावरील पुस्तके, त्यांचे पाकशास्त्राचे वर्ग, त्यांची कीर्तने, त्यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन आणि त्यांचे श्रील प्रभुपादांशी जिव्हाळ्याचे नाते यांमुळे सर्वजण पूर्णतः भारावून गेलेले होते.

शोकसभेच्या वेळी लोकांना भावनावेग अनावर होत होता आणि सर्वांच्या डोळ्यातून आसवांची संततधार वाहत होती. पण हळूहळू त्या आसवांची जागा उल्हास आणि स्मित हास्याने घेतली. भक्तांनी यमुना देवींचे समर्पित आयुष्य व त्यांना निश्चितपणे लाभणारे चिरंतन सौख्याचे अढळ स्थान यांबद्दल आनंदोत्सव साजरा केला.

या शोकसभेची सांगता कर्तमास दास यांनी गायिलेल्या भजनाने व श्रील प्रभुपाद आणि यमुना देवी यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून झाली. अंततः रात्री १० च्या सुमारास, यमुना देवींच्याच पुस्तकातील 'hot cider and short bread' या पाककृतीचा स्वाद घेतल्यानंतर, सर्व भक्त घरोघरी निघून गेले. पण त्यांना मनोमन एक गोष्ट ठामपणे माहीत होती की यमुना देवी खऱ्या अर्थाने आपल्यातून कधीच दूर गेलेल्या नाहीत.

‘‘देवर्षी दास यांनी व मी त्यांना अखेरचे पाहिले तेव्हा त्यांना पूर्णपणे माहीत होती की कोणत्याही क्षणी त्यांना हे जग सोडून जावे लागणार आहे. तरीपण त्यांची चित्तवृत्ती प्रफुल्लित, मनोधैर्य उन्नत होते.’’ निर्मला दासी म्हणाल्या, ‘‘यमुना देवी आम्हाला म्हणाल्या, ‘‘मी (मरणाला) तयार आहे. मला माहीत आहे की, माझे भवितव्य उज्ज्वल आहे.’’ नंतर आमच्याकडे पाहून त्या म्हणाल्या, ‘‘आपणा सर्वांचा भविष्यकाळ उज्ज़्वल आहे’’.

योगेश्वर दास मार्मिकपणे उद्गारले, ‘‘मित्रहो, यमुना देवींची जीवन कहाणी इथं संपलेली नाही, ही तर खरी सुरुवात आहे!’’

-----------

# श्रील प्रभुपादांचा अलौकिक गोडवा व सौंदर्य

### ...यमुना देवी दासी

वैष्णव साधु-सत्संगाचा हा खरोखरीच एक अविस्मरणीय सप्ताह होता. मी माझे धर्मबंधू, धर्मभगिनी, नवे-जुने पारिवारिक मित्र व मैत्रिणी, भाचे-भाच्या, पुतणे-पुतण्या या सर्वांबरोबरच्या या बहुमूल्य देवाणघेवाणीतून खूप काही शिकले आहे. तुम्हा सर्वांना चार शब्द सांगण्याची माझी खरोखरीच पात्रता नाही, तरीपण इस्कॉनमधली एक महिला म्हणून, मला माझ्या भगिनींच्या आवाजात आवाज मिसळून, माझ्या मनातील काही शल्ये व दुःखे तुमच्यासमोर मांडण्याची संधी मिळते आहे हे मी माझे परम सौभाग्य आणि मला मिळालेला सन्मान समजते.

जी.बी.सी.या नात्याने, तुम्ही सर्वजण श्रील प्रभुपादांचा अनमोल वारसा या अत्यंत कठीण व कसोटीच्या काळात पुढे चालविण्यासाठी सामूहिकरीत्या जबाबदार आहात. आजच्या आपल्या चर्चेचा विषय आहे या समृद्ध वारशाचा एक प्रमुख हिस्सा आणि तो म्हणजे श्रील प्रभुपाद यांनी वैष्णव अनुयायांबरोबर जोडलेला घनिष्ठ संबंध. हा मुद्दा चर्चेला घेण्याचे कारण हे की, प्रभुपादांच्या निर्वाणानंतर आपल्याला या गोष्टींचा जवळ जवळ विसर पडला आहे. खरं तर मी त्यांची केलेली व्यक्तिगत सेवा व त्यांचा मला लाभलेला संग, त्याचबरोबर नंतरच्या काळात त्यांनी मला केलेले मार्गदर्शन व दिलेल्या विविध सूचना यांमुळे मी या विषयावर अधिक प्रकाश टाकू शकते.

एक स्वतंत्र व खंबीर तरुण स्त्री या स्वरूपात मी श्रील प्रभुपाद यांना १९६६ साली भेटले व १९६७ साली मी त्यांच्याकडून दीक्षा घेतली. श्रील प्रभुपादांनी स्त्रियांच्या पारंपारिक भूमिकेविषयी आग्रह धरला असता तर मी आणि माझ्यासारख्या माझ्या अन्य कितीतरी गुरूभगिनी इस्कॉनमध्ये आल्याच नसत्या. श्रील प्रभुपादांनी तो हट्ट धरला नाही हे त्यांच्या आध्यात्मिक दूरदृष्टीचे प्रमाण आहे. त्यांनी आम्हाला प्रेमळपणे प्रोत्साहन दिले व आम्हाला नाम संकीर्तनाच्या चळवळीत गुंतविले. ते सदैव आम्हा सर्वांशी ''पण्डितः समदर्शिनः'' या उक्तीप्रमाणे समानतेने व समभावाने वागले.

इस्कॉनमध्ये आलेल्या स्त्रिया आणि पुरुष या दोन्हींमध्ये श्रील प्रभुपादांनी प्रत्येकाचा कल किंवा स्वाभाविक प्रवृत्ती काय आहे ते नेमके हेरले आणि त्यानुसार त्यांनी प्रत्येकाला प्रचार कार्यात दृढपणे गुंतवले. कित्येक वर्षांपर्यंत निरनिराळ्या देशांत व वेगवेगळ्या परिस्थितींत मला त्यांची व्यक्तिगत सेवा करण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्यांनी मला प्रशिक्षित केले व अधिकाधिक जबाबदारी स्वीकारण्यासाठी उद्युक्त केले. त्यांनी मला नियमितपणे कीर्तनात पुढाकार घेणे, प्रवचने देणे, विविध कार्यक्रम आयोजित करणे, आलेल्या पाहुण्यांची सेवा करणे, नेत्यांना भेटणे आणि कृष्ण-भावनामृताचा प्रचार करणे, यासाठी वारंवार उत्तेजन दिले. पूर्वी भारतातील इस्कॉन मध्ये स्त्रियांना जवळ जवळ मज्जाव होता, तरीपण प्रभुपादांनी मला भारतातील वेगवेगळ्या इस्कॉन मंदिरांमध्ये पाठवले व स्वयंपाक आणि विग्रहांच्या सेवेची माहिती करून घेण्यास सांगितले. तसेच त्यांनी मला या दोन्ही बाबींमध्ये इतरांना पण प्रशिक्षित करण्यास सांगितले.

श्रील प्रभुपादांचा स्वभाव, त्यांचे आचरण, त्यांची वर्तणूक व माझे त्यांच्या बरोबरचे वैविध्यपूर्ण अनुभव यांचे तुम्हा सर्वांना अगदी ओझरते दर्शन घडवायचे म्हटले तरी मला इथे दिलेल्या मर्यादित कालावधीपेक्षा अधिक वेळ लागेल. पण एक महत्त्वाची आठवण, जिला मी 'चाणक्य पंडित कथा' म्हणते, ती मात्र सांगायलाच हवी. मी चार प्रसंगी स्वतः उपस्थित होते जेव्हा श्रील प्रभुपादांनी चाणक्य पंडितांचे ''स्त्री आणि राजकारणी यांच्यावर कधीच विश्वास ठेऊ नये!'' हे बोधवचन उद्‌धृत केले आणि अशा प्रत्येक वेळी श्रील प्रभुपादांनी माझी प्रतिक्रिया काय आहे ते अजमाविण्यासाठी माझ्या डोळ्यात रोखून पाहिले. शेवटच्या प्रसंगी, १९७३ साली, मुंबईमधे त्यांनी लोकांच्या छोट्याशा समूहासमोर याच म्हणीचा पुनरुच्चार केला व ते मनापासून हसले; आणि मला म्हणाले, ''यमुना, तुझे काय मत आहे?' मी पटकन् उत्तरले, ''होय श्रील प्रभुपाद, हे खरे आहे!'' हे ऐकल्यावर ते एकदम गंभीर झाले आणि माझ्याकडे भावनावश होऊन बघत म्हणाले, ''पण यमुना, तू स्त्री नाहीस, तू एक वैष्णव आहेस!''

कीर्तनात पुढाकार घेण्यासंबंधीच्या कितीतरी आठवणी आहेत. श्रील प्रभुपाद आपले प्रवचन सुरू करण्यापूर्वी मला कीर्तन करायला सांगायचे. मग समोरचा समुदाय वीस लोकांचा असो किंवा दहा हजार लोकांचा असो. कधी कधी अशी वेळ यायची की असे कीर्तन करणे मला अवघड होऊन बसायचे.



जयपूर येथील राधा माधव मंदिराच्या प्रांगणात मी कीर्तन करण्यास नकार दिला. श्रील प्रभुपादांनी मला बोलावले आणि म्हणाले, ''कीर्तन सुरू कर''. मी म्हणाले, ''प्रभुपाद, मी खरेच कीर्तन करू शकत नाही. माझा घसा खूप दुखतोय.'' प्रभुपाद म्हणाले, ''ते काही नाही, तू कीर्तन सुरू कर!'' अखेर नाईलाजाने, बेडकासारख्या बेसूर आवाजात मी त्या दिवशी कीर्तन केले.

१९७४ च्या उत्तरार्धात, मी माझ्या घर-प्रपंचाचा त्याग केल्यानंतर श्रील प्रभुपाद म्हणाले, ''तू तुझ्या पतीला सोडलेस हे छान केलेस.'' त्यांनी मला संन्यासिनी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. पारंपारिक रीती-रिवाज किंवा रुढीप्रमाणे मी माझे पिता, पती किंवा पुत्र यांच्या संरक्षणाखाली कधीच नव्हते. श्रील प्रभुपाद यांनी मला व्यक्तिदर्शन व लिखित सूचनाद्वारे बंधनरहित उत्तेजन दिले व माझ्या सर्व समस्यांना अनपेक्षित पण समर्पक उत्तरे देऊन मला विस्मयचकित केले.

ओरेगॉन इथं माझ्या गुरूभगिनी दीनतारिणी यांच्यासह स्थिरस्थावर झाल्यावर श्रील प्रभुपाद एका तळमळीच्या गुरूबंधूसमोर आम्हाला 'स्वतंत्र' म्हणायचे. पण दोनदा आम्ही त्यांना सोडून जाण्याचा प्रस्ताव ठेवला तेव्हा त्यांनी आम्हाला प्रेमाने दटावले. ''तुम्ही पाश्चिमात्य मंडळी नेहमीच अस्वस्थ असता,'' त्यांनी मला ताकीत दिली, ''तुम्ही एका जागी का राहू शकत नाही? तू जिथे आहेस तिथेच रहा.'' आम्ही त्यांना विचारले, ''पण श्रील प्रभुपाद, सर्वजण म्हणतात की आम्ही इस्कॉनमध्ये नसलो की आम्हाला तुमचे कृपाशिर्वाद लाभत नाहीत आणि आम्ही काहीच आध्यात्मिक प्रगती करू शकत नाही.'' प्रभुपादांनी उत्तर दिले, ''तू जिथे हरिनामाचा जप करत असतेस तिथे इस्कॉन असते. तेच खरे इस्कॉन आहे.''आम्ही प्रत्युत्तर दिले,''सर्वजण म्हणतात की, आम्हाला भक्तांची साथ संगत लाभत नाही आणि त्यामुळे आम्ही मायेच्या प्रभावाखाली आहोत.'' प्रभुपादांनी उत्तर दिले, ''संगत दोन किंवा



दोनशे माणसांची असू शकते. तुम्ही फक्त दोनच भक्त असाल आणि परस्परांना पूरक असाल तर तुम्ही कृष्णभावनामृतात पारंगत होऊ शकता. पण तुम्ही दोनशे भक्त असाल आणि तुमचा परस्परांबरोबर तिळमात्र ताळमेळ नसेल तर मात्र कोणाचीच प्रगती होऊ शकणार नाही.''

शेवटी मी एवढेच म्हणेन, ''श्रील प्रभुपादांनी मला या चळवळीविषयी चिंता व चिंतन करण्यास शिकविले आहे आणि आज मी खरोखरीच फार चिंतित आहे. श्रील प्रभुपाद यांनी वैष्णव अनुयायांबरोबर जो घनिष्ठ संबंध जोडला होता त्याचे पुनरुज्जीवन करणे व तो आपल्या मनावर बिंबवणे ही आजची सर्वांत निकडीची गरज आहे आणि आपण त्याकडे दुर्लक्ष केले तर श्रील प्रभुपादांच्या थोरवीची ही बाजू पुढच्या पिढीला कधीच माहीत होणार नाही.

इथं मायापूरमध्ये एक अतिविशाल, भव्य व दिव्य मंदिर उभारले जाणार आहे. मी इस्कॉनच्या जी.बी सी.ला कळकळीची विनंती करते की, तुम्ही ज्या स्तुत्य व प्रशंसनीय उपक्रमांचे व्यवस्थापन व आयोजन करत आहात, त्यामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने व सदैव लक्षात ठेवा की या प्रकल्पांमधे भाग घेणाऱ्या भक्तांची नीतिमत्ता, चारित्र्य व वर्तणूकही तितकीच पारदर्शक व निष्कलंक असली पाहिजे. कोणाचीही वागणूक या निकषांच्या विपरीत असेल तर ते श्रील प्रभुपादांच्या लौकिकाला साजेसे नसेल. ही अतिशय गंभीर जबाबदारी आपणा सर्वांच्या खांद्यावर आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, श्रील प्रभुपादांच्या चळवळीच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनावर आपण प्रभुपादांचे प्रत्येक भक्ताबरोबर असलेले निरागस तथा निरोगी आध्यात्मिक संबंध आणि त्यांचा प्रोत्साहनाचा, भक्तांना संरक्षण देण्याचा व मायेचा भाव बिंबविण्याचा प्रयत्न करूया.

श्रील प्रभुपादांचा भक्तांशी व्यक्तिगत संबंध होता आणि आपण या संबंधाची व्यवहाराची जितकी प्रशंसा व आदर करू, तितकेच त्यांचे कृष्णभावनामृतातील पूर्णत्व, त्यांची सदोदित आनंदी व प्रफुल्लित वृत्ती आणि त्यांचा अलौकिक आकर्षक स्वभाव यांचा आपण आदर करू.

अत्यंत काळजीपूर्वक सेवा करून आपल्याला असे आध्यात्मिक वातावरण निर्माण करायचे आहे की जिथे पुरुष, स्त्रिया व मुले आपापल्या इच्छेनुसार व प्रवृत्तीनुसार सेवा करू शकतील व त्याचबरोबर त्यांची कृष्णभावनामृतात भरभराट होईल. आपले कर्तव्य हे आहे की, आपणाला त्यांच्यातील सेवाभावाच्या वृत्तीला मुरड न घालता त्यांना सामर्थ्य व प्रोत्साहन द्यायचे आहे.

अंततः अत्यंत तळमळीने व प्रामाणिकपणे आध्यात्मिक जीवनाची तीव्र आस बाळगणाऱ्या स्त्रियांना मदत करण्यासाठी आपण आपल्या बुद्धीचा आणि हृदयाचा शोध घेऊया. त्यांचे उचित पालनपोषण केल्याशिवाय एक समाज म्हणून आपल्याला काहीच भविष्य नाही. इस्कॉनमधील स्त्रिया श्रील प्रभुपादांनी दिलेला हा काहीसा गुंतागुंतीचा, पण अत्यावश्यक असा, वारसा आहे. पुढची वाटचाल करत असताना श्रील प्रभुपादांचे उदाहरण पाठीमागे सोडण्यापेक्षा आपण ते सदैव आपल्या पुढे ठेवूया. हा दैवी दीपस्तंभ आपल्याला श्री श्री गौर–निताई व श्री श्री राधा कृष्ण यांच्या चरणकमळांपर्यंत पोहचण्याचा मार्ग दाखवेल.

-------------

# यमुना देवी

## गुरुदास

यमुना, तुझ्या वियोगामुळे व तू मला पुन्हा या पृथ्वीतलावर दिसणार नाहीस म्हणून मी दुःखित झालो आहे. तरीपण मला वाटते की, तू सदैव माझ्याजवळ आहेस. आपले चिरंतन नाते भौतिक मर्यादांच्या पलीकडचे आहे आणि तू माझ्या व इतर अनेक लोकांच्या हृदयात निरंतर विराजमान आहेस. तुझ्या चिरंतन आध्यात्मिक प्रवासासाठी आम्ही सर्वजण प्रार्थना करतो आणि त्यात मला आनंद आहे. तू आता वेदनांच्या पार गेली आहेस व आपले परमप्रिय आध्यात्मिक गुरू, श्रीमती राधाराणी व भगवान कृष्ण यांच्या सान्निध्यात आहेस.

तुझे शक्तिशाली अस्तित्व पाहून मी तुझ्या प्रेमात पडलो. तू माझ्यासाठी एक महान जीवनपथ आखून ठेवून मला देऊ केला आहेस. याची मला पुसटशीही कल्पना नव्हती, कारण तू माझा आणि श्रील प्रभुपादांचा परिचय करून दिलास.

तुझ्यातले महान गुण माझ्या लक्षात आले. आध्यात्मिक सौंदर्य, चिकाटी, अत्यंत विश्वासू साथी व मैत्रीण, खंबीर, जिज्ञासू, मधुर, अत्यंत दक्ष, प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष घालणे आणि तू ज्या ज्या गोष्टीत लक्ष घातलेस, त्यातले तुझे प्राविण्य! यमुना, तुझ्या हास्याने अनेक घरे व हृदये उजळून टाकली.

श्रील प्रभुपादांच्या विषयी तर तू अगदी सुरुवातीपासून प्रेम दाखविलेस.

यमुना, आपणा दोघांनाही परमेश्वराकडे जाणारा मार्ग व एकमेकांवषियी करुणा याबद्दल आस्था होती. आपली जोडी चांगलीच जमली होती.

आपण एकत्र हसलो, स्वयंपाक केला, भजने गायली, एकमेकांना वाचून दाखविली व नऊ वर्षांचे सांसारिक जीवन एकमेकांबरोबर वाटून घेतले.

यमुना, आपण दोघांनी एकमेकांना अक्षरशः कितीतरी वेळा वाचविले आहे. आपण एडना आँटीच्या नृत्याच्या क्लाससाठी बेंड ओरेगॉन पर्यंत प्रवास केला होता. मी तिथल्या पदवीदान समारंभाचे फोटो काढले होते. त्यावेळी मी तुझ्या वडिलांनाही भेटलो होतो.

यमुना रॉकपोर्ट कॅलिफोर्निया इथं तू मला अर्धांगवाताच्या झटक्यापासून वाचविले आहेस. मला विषमज्वर झाला तेव्हा तू थेट इस्पितळातच रहायला आलीस व माझ्या बिछान्याखाली झोपणाऱ्या धिप्पाड कुत्र्याशी मुकाबला केलास. मला तर

वाटायचे की तीन आठवड्यांचा ताप व उपवास यामुळे मला भ्रम तर होत नाहीत ना? माझ्या आजारपणात तू इस्पितळातील माझ्या खोलीतच राहिलीस, माझ्यासाठी खास स्वयंपाक केलास (त्यामुळेच तर मला लवकर बरे वाटले) आणि तू मात्र जमिनीवर झोपलीस.

यमुना, आपण दोघे आपली संसार घेऊन रॉकपोर्ट, कॅलिफोर्निया इथं जाण्यासाठी (उसन्या घेतलेल्या) कारमधून निघालो होतो, पण कुठं जायचं हे मात्र माहीत नव्हते. फक्त भगवान श्रीकृष्णांवर ठाम विश्वास होता. आपल्याला 'रेडवूडस्' मध्ये सात खोल्यांचे एक छानसे घरकुल केवळ मासिक 33 डॉलर इतक्या कमी भाड्यात मिळाले. अर्थात सॅन फ्रन्सिस्कोच्या भक्तांनी आपल्याला परत 'पळवून' आणले ही वेगळी गोष्ट.

आपण पश्चिम किनाऱ्यावरील पहिले वहिले हरिनाम कीर्तन विष्णुजन, जयानंद, मुकुंद व तमाल यांच्या संगतीत गायिले.

तू मला स्वयंपाक कसा करायचा व आदर्श देवपूजा कशी करायची ते शिकविलेस. यमुना, इस्कॉनच्या सर्व प्रार्थना शिकणारी तूच पहिली पश्चिमात्य व्यक्ती होतीस.

आपण एशबरी स्ट्रीट, विलार्ड स्ट्रीट इथल्या बाऊलिंग ऍली मंदिरात राहिलो. त्याचप्रमाणे आपण हेन्री हिल, क्लॅम्फम, ब्रिक्स्टन (जिथं रात्रभर केवळ व गीत व संगीत चालू असायचे) बेटरटन स्ट्रीट, बरी प्लेस इथं एकत्र राहिलो. आपण कॉनवे हॉल, हिंदू केंद्र व अर्केशिया हाऊस अशा विविध ठिकाणी श्री केशवजी, श्यामा माताजी, स्वामी सच्चिदानंद व इतर अनेकांबरोबर 'हरे कृष्ण' महामंत्राचा जप केला.

आपण राधा दामोदर मंदिरात राहिलो. कृष्ण बलराम मंदिराच्या जागेवर गवताच्या पेंड्यानी बनविलेल्या झोपड्यांमध्ये राहिलो. त्यानंतर आपण सुरत, अमृतसर, दिल्ली व अन्य कितीतरी ठिकाणी एकत्र गेलो व राहिलो.

यमुना, इस्कॉनची चळवळ वाढत गेली तसे आपले सामान्य गृहस्थ जीवन आपल्याला दुर्लभ झाले. कारण तुला स्त्रियांच्या आश्रमाची प्रभारी नेमण्यात आले होते, तर मला पुरुषांच्या आश्रमाचा प्रभारी नेमले गेले होते.

श्रील प्रभुपादांनी आपल्यामध्ये अधिकाधिक गुण व योग्यता पाहिल्या आणि आपल्याला अधिकाधिक सेवा दिल्या. एकदा मी श्रील प्रभुपादांना म्हणालो की, मला बांधकामामधले काहीही माहीत नाही, तेव्हा श्रील प्रभुपाद म्हणाले, ''भगवान श्रीकृष्ण तुला मदत करतील''.

यमुना, आपण पायी, टॅक्सीने, सायकलीने, रिक्षाने, आगगाडीने, मोटर गाडीने, बोटीने, स्की, हायड्रोफॉइल तथा विमानाने एकत्र प्रवास केला.

आपण प्रत्येक बाबतीत परस्परांशी सल्ला मसलत केली, पण त्यानंतर इतरांची सेवा करण्यासाठी वेगळे झालो. यमुना, आपण एकाच वेळी एक होतो आणि अलग अलगही होतो.

यमुना, आपण कृष्ण बलराम मंदिराचे बांधकाम करत होतो तेव्हा राधा दामोदर मंदिरात राहिलो होतो.

मला आठवते, तू मंदिर व विग्रहांच्या कक्षाचा आराखडा तयार केला होतास. त्यांचे नियोजन तू, मी व जयतीर्थ असे तिघांनी मिळून केले होते. पण या बाबतीत पुढाकार मात्र तू घेतला होतास. रुंद दरवाजे, भिंतीवरचे हुक, स्वतंत्र स्वयंपाकघर इत्यादींच्या रचनेत तुझे महत्त्वाचे योगदान होते. तू ज्या ज्या गोष्टींना स्पर्श केलास त्यातून तुझी कलात्मक वृत्ती डोकावत होती.

यमुना, तू दृढ व अव्वल दर्जाची भक्त आहेस. तू बुद्धिमत्ता, अंतर्ज्ञान व समय यांचा नेहमी उचित उपयोग केलास.

नवे विग्रह आणण्यासाठी श्रील प्रभुपादांनी तुला व मधुद्विष यांना जयपूरला पाठवले होते. त्यावेळचे अनुभव सांगताना मधुद्विष म्हणतात, ''मी त्या वेळी नुकताच दीक्षा झालेला नवा संन्यासी होतो. मला स्त्रीकडे पाहणे किंवा कुठल्याही स्त्रीबरोबर एकटे असणे वर्ज्य होते, एखाद्या स्त्रीबरोबर प्रवास करणे तर दूरची गोष्ट होती. तिथल्या रिक्षा आकाराने काहीशा लहान होत्या व यमुना जराशी लठ्ठ होती म्हणून आम्ही जेव्हा रिक्षाने प्रवास करायचो तेव्हा मी माझा 'संन्यास दंड' आम्हा दोघांच्या मधे ठेवून पाहिला. पण रिक्षात बसणाऱ्या धक्क्यामुळे त्याचा काहीही उपयोग होत नव्हता. त्यामुळे मी तसे करणे सोडून दिले''.

''तिच्याबरोबर 3-4 दिवस घालविल्यावर मला दिसून आले की, ती महान भक्त होती. ती नेहमी जप करत असायची किंवा स्वामीजींविषयी बोलत असायची. तिच्या हृदयातल्या चैत्य गुरुंमुळे तिचे अंतर्ज्ञान आश्चर्यकारक होते. तिला एका मूर्तीवाल्या कारागिराकडे राधा व दुसऱ्या मूर्तीवाल्या कारागिराकडे कृष्ण मिळाले''.

मी तिच्याशी कधीच वाद घातला नाही. तिची माझी जोडी चांगलीच जमली होती. तसे ती इतरांबरोबर सुद्धा छान जमवून घेत असे. मी म्हणू शकतो की, आमचे लग्न कार्यात्मक पातळीवर यशस्वी होते. आम्हा उभयतांकडे अनेक लोक सल्ला घेण्यासाठी येत असत. त्यात गृहस्थ व ब्रह्मचारी पण असायचे.

तिला भारतात खूप कठीण व खडतर परिस्थितीशी सामना करावा लागला होता. हे सर्वांना माहीत नाही, पण मला चांगले माहीत आहे. तिने मला एकदा सांगितले होते की, सतत पाच वर्षे कठोर परिस्थितीशी झगडणे, बराच स्वार्थत्याग व काही आजारपणे या सर्व तपस्येनंतर तिला विश्रांतीची नितांत गरज होती. आम्ही वृंदावन मंदिरासाठी देणग्या गोळा करण्याकरिता पाश्चिमात्य देशांत गेलो होतो. आम्ही फ्लोरिडामध्ये असताना यमुना व दीनतारिणी यांनी मला व इस्कॉनची चळवळ काही काळापुरती सोडली होती. पुढच्याच आठवड्यात माझे वडील वारले.

मी अटलांटाला गेलो व पत्र लिहून श्रील प्रभुपादांना विचारले की, मी काय करू? सुरुवातीला ते म्हणाले की, तू तिला परत आणण्याचा प्रयत्न कर. पण ती अडून बसली होती. तिला 'ब्रेक' हवा होता. शिवाय तिच्याशी संवाद साधणे पण मुष्किल झाले होते.

अखेर अशा परिस्थितीत मी संन्यास घेतला. ती ओरेगॉनला गेली व तिने पुन्हा एकदा भक्तिमय जीवनात प्रवेश केला. तिने तिथेच 'शरणागती' आश्रम स्थापन केला.

माझ्या सुदैवाने फ्लोरिडा येथे अलिकडेच माझे व तिचे, तात्पुरते का असेना, पुनर्मीलन झाले व मला तिच्याबरोबर तीन तास व्यतीत करता आले. आम्ही आमच्या आठवणींना उजाळा दिला व एकत्र जप केला. तिने आपल्या सुमधुर आवाजात तिथली फुले व पक्षी यांच्यासाठी सुंदर भजने गायिली.

कृष्ण बलराम मंदिराच्या मालमत्तेवर एक दमेकरी कुत्रा होता. मला आठवते आम्ही उभयता त्याला 'कृष्णप्रसाद' खायला घालत असू. आम्ही त्याचे नाव 'डॉगवूड' असे ठेवले होते. तो आमच्याकडे आला तेव्हा त्याला धाप लागलेली होती, पण आम्ही त्याची योग्य ती काळजी घेतल्यावर तो आरामात श्वास घेऊ लागता होता.

यमुना, मला आठवते टॉम ड्रिबर्ग, एस. एस. धवन, श्रीमान धर, श्यामा माता, भरतपुरचे महाराज आणि इतर अनेक भक्त व पाहुण्यांबरोबर तू किती मुत्सद्देगिरीने व मोहकपणे वागायचीस.

तू ज्यांच्या ज्यांच्या आयुष्यात आलीस ते तुझ्या प्रेमात पडले, म्हणूनच राधा कृष्ण व प्रभुपाद सुद्धा तुझ्या प्रेमात पडले. मी जसे लोकांना सतत श्रील प्रभुपादांविषयी सांगत असे, तशीच तू पण सदैव त्यांच्याविषयीच बोलत असायचीस. भारतीय समाजाला तू खूप आवडलीस आणि तू त्यांच्या पाककृती व तंत्रे आत्मसात केलीस. श्रील प्रभुपाद म्हणायचे की, तू एक उत्कृष्ट सुगरण आहेस. तसेच जानकीला चिडविण्यासाठी ते म्हणायचे की, तू जानकीपेक्षा उत्कृष्ट सुगरण आहेस.

आपण दोघे एकत्र सेवा करत असू तेव्हा मी तुझ्यावर विसंबून राहू शकत असे. कारण तू ज्या गोष्टी करणे गरजेचे असायचे त्या अगोदरच गृहित धरून योग्य ती कृती करायचीस व आपण ती सेवा श्रील प्रभुपादांना अर्पण करत असू. श्रील प्रभुपाद तुला नेहमी प्रवचन देणे, कीर्तनात पुढाकार घेणे, प्रार्थना शिकणे, कलात्मक अक्षर लेखन करणे, 'हरे कृष्ण' मंत्राचे संस्कृत 'कव्हर' करणे इत्यादी अनेक सेवा करण्यास सांगायचे.

हरे कृष्ण महामंत्राच्या व 'गोविंदम् आदि पुरुषम्' (ब्रह्म संहिता) च्या ध्वनिमुद्रणात मुख्य स्वर तुझा आहे. अर्थात हे संपूर्ण जगभरात प्रत्येक शहरातील व खेड्यातील सर्वांना माहीत आहे. कारण ते ध्वनिमुद्रण रोज सकाळी प्रत्येक मंदिरात वाजविले जाते. श्रील प्रभुपादांनी पहिल्यांदा हे ध्वनिमुद्रण ऐकले तेव्हा ते अक्षरशः रडले होते. श्रील प्रभुपादांनी तुला पहिली 'माहिळा जी.बी.सी.' बनण्यास सांगितले होते. परंतु तुला भगवान श्रीकृष्णांसाठी स्वयंपाक करून व विग्रहांची प्रेममय आराधना करून सेवा करायची होती, म्हणून तू त्या पदाला नकार दिलास. त्याच्याही पुढे जाऊन तू मला पुढे सांगितले होतेस, ''मला व्यवस्थापन व राजकारण यात बिलकुल रस नाही.''

यमुना, तू एक अद्वितीय भक्त आहेस. तू मला व इतर अनेकांना चांगले भक्त बनण्यासाठी प्रोत्साहन दिले आहेस. तुझ्याबरोबर व्यतीत केलेले व प्रेमपूर्ण असे अनेकानेक क्षण मला माझ्या आयुष्यात दिल्याबद्दल मी श्रील प्रभुपाद व राधा कृष्ण यांचा आभारी आहे.

मंदिराच्या सभागृहातून, संगीत महोत्सवातून, ध्वनिमूद्रण किंवा दूरदर्शन स्टुडिओमधून, प्रत्येक शहरातून व खेड्यातून, आपल्या या जगात, संपूर्ण विश्वात आणि माझ्या हृदयातून पाझरणारे तुझे 'हरी हरी बोल' हे शब्द मी अजूनी ऐकतो आहे.

हातात जपमाळेची पिशवी व ओठावर 'हरे कृष्ण, हरे राम' हा महामंत्र अशा अवस्थेत तू आपला भौतिक देह सोडलास. तुझ्या या महान मानसिकतेचा व सेवेचा जयजयकार असो!

मला पूर्णपणे खात्री आहे आणि इतर अनेकांना पण मान्य आहे की, तू पुन्हा एकदा श्रील प्रभुपादांबरोबर अत्यंत सुखी व शांतपूर्ण जीवन जगत आहेस, त्यांच्यासाठी स्वयंपाक बनवत आहेस व 'गोविंदम् आदि पुरुषम् तमहम् भजामी...' हे भजन गात आहेस.

.................................................

## यमुना देवींच्या आणखी काही आठवणी...
## 'बाय हिज एक्झांपल' या पुस्तकातून

रॉकपोर्टच्या मंडळीनी आम्हाला निरोप दिला. उद्धव, रामानुज, लीलावती आणि मुरारी – हे आमचे भविष्यातील पण अजुनी दीक्षा न झालेले मित्र– आम्हाला परत न्यायला आले होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, स्वामीजी आता जास्ती वेळा मंदिरात येतात व आठवड्यातून तीन वेळा, सकाळी व संध्याकाळी, कीर्तनाचे नेतृत्व करतात. दर रविवारी आम्ही भव्य मेजवानीचे आयोजन करतो व आता मंदिरात पूर्वी पेक्षा पुष्कळ लोक यायला लागले आहेत.

### सॅन फ्रान्सिस्कोला परत

विलार्ड स्ट्रीटवरील आमच्या घरी पियानो होता व तिथली जमीन लाकडी होती. तिथे जोन, आमचा कुत्रा क्यू ताल व माझ्यासाठी एक खोली राखून ठेवण्यात आली होती. हर्षराणी जीवानंद ही जोडी एका खोलीत रहात होती व दुसऱ्या खोलीत लीलावती व मुरारी ही जोडी रहात होती. दिवाणखान्यातून स्वयंपाकघराला असलेल्या एका मोठ्या खोलीत जाता येत असे. दिवाणखान्याचा दरवाजा व जिना एका हिरव्यागार परसदारात उघडत होता. गोल्डन गेट उद्यानातून गोल्डन गेट पूल डोकावून बघत असे व त्याचे ओझरते दर्शन सूर्यप्रकाशात चमकत असे.

### जोनची 'यमुना' झाली

जसजसे स्वामीजी व मी जवळ येत गेलो तशी लवकरच माझी दीक्षा झाली व माझे दीक्षेनंतरचे नाव 'गुरुदास' असे झाले व जोनचे दीक्षेनंतर नामकरण 'यमुना' असे झाले. यमुना ही भारतातील वृंदावनाजवळ वाहणारी नदी असून कधी कधी तिच्या नावाचा उच्चार 'जमुना' असा पण केला जातो. दीक्षा समारंभ झाल्यानंतर त्या रात्री मी व यमुना स्वामीजींना भेटण्यासाठी गेलो. त्यांनी आमचे त्यांच्या हार्दिक व दिलखुलासा हास्याने स्वागत केले व ते म्हणाले, ''तुम्ही दोघेही भगवान श्रीकृष्णांचे महान भक्त आहात.''

आम्ही दोघेही शांत व आरामात होतो. काही वेळानंतर यमुनाने विचारले, ''आम्ही दोघांनी केव्हा लग्न करावे अशी तुमची इच्छा आहे?'' ''उद्या'', स्वामीजींनी उत्तर दिले. त्यांनी पुन्हा एकदा आपल्या मनासारखे केले. ते माझ्या अशांत स्वभावाला शरण आणू इच्छित होते. मला वाटले की, मी जणू स्वामीजी व भगवान श्रीकृष्ण

यांच्याबरोबर लपंडाव खेळत होतो.

## लग्न समारंभ

लग्न समारंभाच्या वेळी एक यज्ञ करण्यात आला. कित्येक पाहुणे व अभ्यागत यांनी मंदिराचे सभागृह भरून गेले होते. उपस्थित मंडळींमधे क्लॅमथ, फाल्स, ओरेगॉनहून आलेली यमुनेची आंटी एडना पण होती. यमुनेची बहिण जानकी यज्ञाच्या तयारीसाठी धावपळ करत होती. यज्ञात वापरायचे तूप बनविण्यासाठी तिने लोण्याऐवजी चुकून 'मार्गरीन' आणले होते. भरीत भर म्हणून की काय, 'समिधा' म्हणून जंगलातील झाडांच्या फांद्या व उडाळ्या वापरण्याऐवजी फळांच्या रिकाम्या खोक्यांच्या लाकडी फळ्या वापरण्यात येत होत्या. त्यामुळे यज्ञादरम्यान अग्नी सतत तेवत राहिला होता. श्रील प्रभुपादांनी आपल्या सोनेरी बोटांनी सराइतपणे अगदी योग्य त्या लाकडाच्या ढलप्या उचलल्या व त्यांचा तंबूसारखा आकार तयार केला. त्यांनी लाकडाचा प्रत्येक तुकडा आधी तुपात बुडवून घेतला. अग्नी प्रज्वलित व्हायचा आणि मंद व्हायचा, पुन्हा वर उठायचा आणि विझायचा. पण स्वामीजींनी प्रयत्न सोडला नाही. अखेरीस एकदाचा छानसा जाळ तयार झाला आणि अग्नीच्या धगधगणाऱ्या ज्वाळांनी सारे मंदिर उजळून टाकले.

यज्ञाचा धूर मंदिराच्या छतापर्यंत वर उठत होता. आता आणखी पाहुणे आले होते. त्यानंतर बार्ली, भात, विविध रंग व केळी यज्ञात अर्पण केली गेली. स्वामीजी पुरातन संस्कृत व बंगाली श्लोक व भजने म्हणत होते. ते म्हणाले, ''लग्न हे या आगीसारखेच असते, सुरुवात थोडी हळूहळू होते, नंतर मात्र चक्क स्फोट होतो व ज्वाळा धगधगू लागतात. तुम्ही दोघेही उत्तम भक्त आहात आणि दोघे एकत्र आल्यावर यापेक्षा किमान दुप्पट भक्कम व्हाल.''

लग्नाचा विधी व समारंभ संपल्यावर आम्ही सारे जंगी मेजवानीसाठी बसलो. या पंक्तीत सामोसे, पुऱ्या, भात, भाज्यांचे विविध प्रकार, गोड पदार्थ व डाळ इतके सारे पदार्थ वाढण्यात आले होते. स्वामीजी स्वतः जमीनीवर बसले, आमच्याबरोबर जेवले व आमच्याशी हास्य विनोद केला. ''प्रत्येकाला भरपेट खायला मिळेल याची खात्री करा.'' ते म्हणाले. आमच्या पवित्र पित्याच्या सहवासात आम्ही सर्वजण सुखी व समाधानी होतो.

## श्री श्री राधा कृष्ण मंदिर

आता शेजघरातील दाटीवाटीने झोपलेल्या रोज नव्या चेहऱ्यांच्या सान्निध्यात जागे होण्याऐवजी मी रोज सकाळी यमुनेच्या संगतीत उठत असे. माझ्या ओठावर पावन हरिनाम असे व मला आध्यात्मिकदृष्ट्या स्वच्छ व पवित्र वाटत असे. सकाळची शॉवरखालची आंघोळ ताजेतवाने करणारी असायची, तसेच ऍशबरी स्ट्रीटवरचा फेरफटकासुद्धा. याच रस्त्याने आम्ही नव्या फ्रेडरिक स्ट्रीटवरील श्री श्री राधा कृष्ण मंदिराकडे जात असू. रस्त्याच्या पलिकडील 'ग्रेटफुल डेड' इथं रात्रभर चालणाऱ्या पार्ट्यांच्या पाऊलखुणा आम्ही मंदिराकडे चालत जात असताना दिसत असत. आम्ही फ्रेडरिक स्ट्रीटवर उजवीकडे वळत असू तिथे जीवानंद व हर्षराणी आम्हाला भेटत असत व त्यानंतर आम्ही टेकडीवरून खाली उतरत असू. या सर्व नवेपणाने मला उत्तेजित वाटायचे. त्याचबरोबर भक्तांच्या या वाढणाऱ्या कुटुंबाचा एक भाग असल्यामुळे मला कृतकृत्य वाटत होते.

स्वामीजींच्या जवळ आमची गुणवत्ता, स्वप्ने व आशा आकांक्षा शोधून काढण्याचे आणि त्यानुसार आम्हाला भगवान श्रीकृष्णांच्या सेवेत गुंतवण्याचे कसब होते. ''आपण जे काही करतो'' त्यांनी आम्हाला सांगितले, ''ते आपण श्रीकृष्णांसाठी करू शकतो, आपण आपले अन्न कृतज्ञतापूर्वक अर्पण करू शकतो, गुरुदास तू सुंदर फोटो काढू शकतोस आणि यमुना तू सुंदर हस्ताक्षरात लिहू शकतेस.'' श्रील प्रभुपाद दर सोमवारी, बुधवारी व शुक्रवारी सकाळी आणि संध्याकाळी सात वाजता कीर्तन करायचे व प्रवचन द्यायचे. तिथले वातावरण या जागाच्या पलीकडले व स्वर्गीय वाटायचे. आम्ही सर्वजण एकत्र व एकसुराने गात असू. त्यानंतर स्वामीजी थोडा वेळ व्याख्यान द्यायचे व शेवटी ते भक्तांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत.

यमुना व मी विलार्ड स्ट्रीटवरील एका सुंदर घरात रहायला गेलो. ते घर मंदिरापासून केवळ दोन मिनिटांच्या अंतरावर होते. तिथं एक सुंदर पियानो होता व तिथली जमीन लाकडी होती. लीलावती, मुरारी, जीवानंद, हर्षराणी व माझा कुत्रा 'क्यू ताल' हे सर्वजण माझ्याबरोबर रहायला आले. प्रत्येक विवाहित जोडप्याला एक लहान खोली मिळाली होती व आम्हा सर्वांमधे मिळून सामायिक दिवाणखाना व स्वयंपाक घर होते. सॅन फ्रान्सिस्को पार्क्स व रिक्रियेशन डिपार्टमेंटने स्कॉट स्ट्रीटवर चालविलेल्या फोटो केंद्रात मी माझ्या फोटोंचे डेवलपिंग व प्रिंटिंग करत असे.

आमच्यापैकी काहीजण, जयानंद (टॅक्सी), श्यामसुंदर (सुतारकाम), कृष्ण दास (सोनारकाम) आणि मी स्वतः (ई. एस. एल. शिक्षक) असे निरनिराळ्या ठिकाणी काम करत होतो व आपापल्या कमाईपैकी काही रक्कम फ्रेडरिक स्ट्रीटवरील मंदिराच्या व्यवस्थापनेसाठी देत होतो. बाकीचे भक्त मंदिराची व आवाराची साफसफाई, स्वयंपाक व मंदिरातील अन्य सेवा करत असत. यमुनेला व मला आमचा हा नवा परिवार आवडला. आम्ही सारे आरोग्याच्या व व्यावहारिक कारणासाठी शुद्ध शाकाहारी होतो. यमुना कमीत कमी सामग्रीतून चविष्ट व सुंदर प्रसाद बनवत असे. हुशार, हेकेखोर पण गोड असलेली यमुना खरोखरीच उत्तम स्वयंपाक बनवत असे. अशा स्त्रीची साथ लाभणे हे खरोखरीच माझे परम सौभाग्य होते.

स्वामीजी आठवड्यातून तीन दिवस सकाळी सात वाजता त्यांच्या खोलीतून खाली मंदिरात यायचे. मंदिरातल्या उजळ प्रकाशात ते झळाळत असायचे. ते हळुवार हास्य करत यायचे तेव्हा त्यांचा भगवा पोषाख वाऱ्याच्या मंद झुळकेवर लहरत असायचा. अर्धोन्मिलीत नेत्रांनी ते 'हरे कृष्ण' मंत्राचा जप त्यांच्या मधुर, घोगऱ्या व करुणामय आवाजात सुरू करत असत. आम्ही एका समुहाच्या रूपात त्यांच्या पाठीमागून गात असू. पुन्हा आम्ही त्यांचा जप ऐकायचो व पुनश्च तो मंत्र गायचो. मला वाटायचे माझे हृदय भगवान श्रीकृष्णांच्या हृदयात समाविष्ट होत आहे. अलौकिक ध्वनिलहरींच्या कंपनात आम्ही विरघळून जायचो. ते आमच्याकडे पाहून हसायचे. ते गौतम बुद्ध, सांता क्लॉज वा सेंट फ्रान्सिस प्रमाणे आम्हाला आशीर्वाद देत आहेत असे भासायचे.

आमचा जप पूर्ण झाल्यानंतर स्वामीजी कधी आमच्याबरोबर भगवान श्रीकृष्णांच्या माधुर्याविषयी तर कधी कर्माविषयी बोलत असत. इतर वेळी ते भगवान श्रीकृष्णांना भक्तिमय सेवा अर्पण करून आपण प्रत्येक गोष्ट कशी 'कृष्णमय' करू शकतो व त्याचा आपणा सर्वांना कसा फायदा होतो ते सांगत असत. ते म्हणायचे, ''या गोष्टीची अखिल मानव जातीला मदत होईल. आपण झाडाच्या मुळाला पाणी घातले की आपोआप त्याच्या फांद्या, पाने, फुले इत्यादींना पोषण मिळेल.'' सेवाभाव काय असतो हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने व बोधपर सूचना यांमधून आम्हाला शिकविले.

रोज रात्री नव्यानेच दीक्षा मिळालेले भक्त मंदिरात जमा व्हायचे. मुकुंद कॉंगो

ड्रम घेऊन यायचा. यमुना आत्मविश्‍वासपूर्ण दिसत असायची. जणू काही मंदिराची माताच. तिचे सुंदर, लांबसडक व काळेभोर केस पाठीवर लहरत असायचे. ती सर्व मित्रांकडे पाहून हसायची. तिच्या पाठोपाठ तिची बहीण जानकी कळसुत्री बाहुलीसारखी यायची व ती खुदुखुदू हसत असायची.

गोविंद दासी व गौरसुंदर (सर्वात पहिल्या विवाहित जोडप्यापैकी एक) त्यांनी श्रील प्रभुपादांसाठी रंगविलेल्या नवीन रंगीत चित्रांपैकी एक चित्र घेऊन आले व त्यांनी ते सर्वांनी प्रशंसा करण्यासाठी समोरच्या भिंतीवर टांगले.

बरोबर सात वाजता श्रील प्रभुपाद तिथे आले. मान किंचित उंचावलेली, नेहमीप्रमाणे राजेशाही, तरीपण निगर्वी. त्यांच्या पाठोपाठ स्नो व्हाईटच्या बुटक्यासारखा अडखळत उपेंद्र आला. स्वामीजी थेट कोणाकडेही पहात नव्हते. तरही ते आम्हा सर्वांना आपल्या प्रेमळ व वात्सल्यपूर्ण नजरेने कुरवाळत होते. त्यानंतर ते हसले, देव्हाऱ्याकडे गेले व आम्ही रंगविलेल्या पंचतत्त्वाच्या नव्या चित्राजवळ जाऊन खाली बसले. ते पाच अवतार, त्यांचे बाहू उंचावलेले, नेत्र गोलोक वृंदावनातील भगवान श्रीकृष्णांकडे लागलेले, चैतन्य महाप्रभू, नित्यानंद, श्री अद्वैत, गदाधर व श्रीवास यांनी आमच्या भक्तिभावात भर घातली. स्वामीजींनी आपल्या गुरुपरंपरेसाठी 'वंदेहम् श्रीगुरोः' ही प्रार्थना गायिली तेव्हा आमची चित्तवृत्ती शांत व सोज्ज्वळ झाली. प्रार्थना संपली तेव्हा नुकता कुठे सूर्यास्त होत होता. मावळत्या सूर्याची सोनेरी किरणे पुढच्या दारातून व खिडकीतून अलगद घरंगळत आत आली व त्यांनी मंदिराच्या सभागृहाला पिवळ्या-नारंगी प्रकाशाने न्हाऊ घातले. मी एका उशीवर मांडी घालून पाठ ताठ करून बसलो होतो. आता सर्वांचे डोळे स्वामीजींवर खिळलेले होते.

त्यांनी 'बेल मेटल' पासून बनलेले आपले टाळ बाहेर काढले व खास करून कुठल्याच वस्तू वा व्यक्तीकडे न पाहता सभोवार सर्वसाधारण नजर फिरविली. त्यानंतर त्यानी नेहमीचा त्रितालः 'टिंग, टिंग, टाँग, टिंग, टिंग, टाँग' वाजविण्यास सुरुवात केली. अर्थात तिसरा ठोका हा चांगलाच थरथरायचा. आपल्या घोगऱ्या व खणखणीत आवाजात त्यांनी ''हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे । हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।।'' गायला सुरुवात केली.

महामंत्राची धून आता गती पकडू लागली होती, त्यामुळे बसून राहणे कठीण झाले होते. जणू काही ठरविल्याप्रमाणे आम्ही सर्वजण एकदमच उठून उभे राहिलो.

हयग्रीव ‘केल्प हॉर्न’वाजवीत होता व घनगर्ज आवाजात घुमणाऱ्या ‘केटल ड्रम’ने सुंदर ताल धरला होता. आता महामंत्राची धुंदी माझ्यावर पण चढायला सुरुवात झालेली असायची. श्रील प्रभुपादांच्या बरोबर सामूहिकरित्या ‘हरे कृष्ण’ महामंत्राचे गायन करण्यात एक औरच मजा असायची. साधारणपणे कीर्तन तासभर चालायचे. कीर्तनाचा आवाज हळूहळू मोठा होत जायचा व त्यानंतर मंद, मधुर आणि नाजुक आवाज आणि अखेरीस जोशपूर्ण व आनंदी परमोच्च बिंदू. असे कीर्तन संपल्यानंतर माझ्या चेहऱ्यावर एक तजेला, स्वच्छ, उन्नत व आनंदमय भाव मागे ठेऊन जात असे.

कीर्तन अधिकच जोरदार व सुस्वर होत गेले. यमुना ओरडली, ‘‘हरी हरी बोल!’’ तिचा भरदार आवाज आपल्या शुद्ध आध्यात्मिक बळावर संपूर्ण सभागृहाला भेदून गेला. जानकीनेही आपल्या बहिणीला प्रतिसाद दिला व ओरडली, ‘‘हरी हरी बोल!’’

मुकुंद सर्वांना नृत्य करायला उद्युक्त करत सराइतपणे ड्रम वाजवत होता. मला वाटले जणू मी शरीराचा त्याग करत आहे. आम्ही सर्वजण स्थिर तरीही प्रवाही परमानंदाप्रत पोहोचलो. काही वेळाने स्वामीजींनी टाळ वाजविण्याची गती वाढविली. आम्ही पण त्यांना साजेसा प्रतिसाद दिला व तितक्याच दृतगतीने नृत्य करू लागलो. कीर्तन दीर्घ व कर्णमधुर होते. मधूनच यमुनेचे ‘‘हरी हरी बोल!’’ ऐकू येत होते. ती संपूर्ण खोली ‘स्फोटक’ बनली होती, सारे शहर कीर्तनाच्या तालावर डोलत होते, सारे जग कंपन पावत होते, संपूर्ण विश्व समतोल बनले होते आणि मी अलौकिक आनंदाचा अनुभव घेत होतो. बोंगो, केल्प हॉर्न, केटल ड्रम, झांजा, ट्रंपेट व आफ्रिकन तालवाद्ये येऊन एकत्रित तालात थांबली. स्वामीजी म्हणाले, ‘‘गौर प्रेमानंदे हरी हरी बोल!’’ एकाच वेळी मधुर व गंभीर असलेल्या आवाजात स्वामीजींनी आपल्या आध्यात्मिक परंपरेतील पूर्वजांची स्तुती करणारी स्तोत्रे गायिली. आम्ही नतमस्तक होऊन आध्यात्मिक परंपरेतील पूर्वजांची स्तुती करणारी स्तोत्रे गायिली. आम्ही नतमस्तक होऊन जमिनीवर लोळण घेतली. आम्ही लगेच उठलो व ताठ बसलो, कारण आता स्वामीजी बोलायला सुरुवात करणार होते. स्वामीजी आपल्या उच्चासनावर स्थिरस्थावर झाले व म्हणाले, ‘‘इथं जमलेल्या सर्व तरुण मुलामुलींनो, इथे आल्याबद्दल आभार...’’ आम्हाला भिंतीवर दणके दिल्याचा आवाज ऐकू आला. शेजारच्या दरवाज्यावर मारलेली जोरदार थाप आम्हाला भिंतीवरच्या थरथराटाने जाणवली. भिंतीवरची फ्रेम केलेली चित्रे हलली. पुन्हा एकदा जोराची थाप पडली. ते

बोलायचे थांबले, त्यांनी मला जवळ बोलावले व माझ्याकडे किंचित झुकले. माझा कान अगदी त्यांच्या मुखाजवळ होता. मला वाटले, मला हा एक विशेष अधिकार प्राप्त झाला आहे. त्यांनी मला विचारले, ''हा कसला आवाज आहे?'

जयानंद सॅन फ्रान्सिस्कोमधील पहिल्या मंदिराचा अध्यक्ष होता व त्याचा सहवास मला खूप आवडायचा. माझी उपाध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर आम्ही दोघे गाडीवर शेतकऱ्यांच्या बाजारात किंवा फुलांच्या दुकानात एकत्रच जात असू व मंदिरातल्या विविध समारंभांची आखणी करत असू. जयानंदने यमुनाला व मला आपले एशबरी स्ट्रीटवरील व 'ग्रेटफुल डेड' समोर असलेले घर रहायला दिले आणि तो स्वत: फ्रेडरिक स्ट्रीट वरील मंदिराच्या पडीक तळघरात रहायला गेला. तिथे इतर ब्रह्मचारी रहात असत व तो त्यांच्याबरोबर तिथल्या फरशीवर झोपत असे.

ते खरोखरीच सुख व शांतीपूर्ण दिवस होते. स्वामीजी खाली यायचे व आमच्या प्रीती भोजनात सहभागी व्हायचे. ते एखाद्या अभिमानी पित्यासारखे होते व आपल्या प्रेमाची किरणे आमच्यावर विखरत असत. त्यानीच आम्हाला बनवायला शिकवलेली डाळ व विविध भाज्या ते आवडीने खात असत.

आम्ही भक्तीच्या या बेटावर सुरक्षित व सुखी होतो. प्रेम व भक्ती बरोबरच जगण्यासाठी एक नवे कारण देत होतो.

## कॅलिफोर्नियाची तुकडी

ते सर्वजण जेवायला बसले व आम्ही त्यांना प्रसाद वाढू लागलो. ते विमानाच्या दीर्घ प्रवासानंतर भुकेलेले होते. साऱ्या मुली – जानकी, मालती व यमुना – शाकाहारी कृष्ण प्रसादाच्या स्वयंपाकात भराभर प्रगती करत होत्या व त्यांनी रांधलेले अन्न रुचकर होते. त्यानंतर आम्ही बास्केट बॉलच्या खेळात पाडतात तसे छोटे छोटे गट पाडले. यमुना व जानकी फ्रँकीबरोबर, मालती ऍंजी बरोबर, श्यामसुंदर आणि मुकुंद रॉक, स्वीट विलियम व पीट बरोबर, मी केन केसीला घेऊन एका खिडकीजवळ बसलो. एक बुद्धिस्ट माणूस एकटाच बसून राहिला. आमच्या आपापसातल्या संभाषणांनी ती खोली भरून गेली.

## बीटल्स्‌ची भेट

आम्हाला ॲपल कंपनीचे चावी भरल्यावर चालणारे एक चालते–बोलते खेळणे नॉटिंग हिल इथल्या ऑल सेंटस् चर्चमधल्या कीर्तनाच्या वेळी सापडले

होते. यमुनाने त्या खेळण्याच्या मागे सोनेरी रंगाने लिहिले, ‘‘हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।’’ चौथ्या दिवशी आम्ही ते खेळणे, ‘कृष्ण भावनामृत येत आहे’ असा मजकूर असलेल्या हस्तपत्रकासोबत ऍपल कंपनीच्या कार्यालयात पाठवले. यमुनेने इंटरनॅशनल टाईम्स साठी कॅलिग्राफीत एक ‘वेष्टण’ तयार केले होते. त्यात ‘हरे कृष्ण’ मंत्र देवनागरी लिपीत लिहिलेला होता. पाचव्या दिवशी आम्ही यमुनेने बनविलेले संस्कृत कव्हर व त्या बरोबर प्रभुपादांचे डोळे दाखविणारे आमचे हस्तपत्रक पाठवले. त्यात लिहिले होते, ‘कृष्ण भावनामृत येथे आहे!’ आम्ही अशी अलौकिक पाकिटे ऍपलच्या कार्यालयात रोज पाठवत होतो.

## बेटरटन स्ट्रीट येथे जॉर्ज

यमुना हातात महाप्रसादाची थाळी घेऊन स्वयंपाक घरातून बाहेर आली. तिच्या चेहऱ्यावर नेहमीप्रमाणे मोहक हास्य होते. तिने आम्हाला मंदिराच्या खोलीत येण्यासाठी इशारा केला. तिने ती थाळी देव्हाऱ्यावर ठेवली. आम्ही सर्वांना टाळ दिले. मी टाळांची दोरी माझ्या दोन बोटांभोवती गुंडाळली. जॉर्जने पण तसेच केले हे मी पहिले. ‘‘चला, आपण कीर्तन करू या.’’ ती म्हणाली. मुकुंदने मृदंगावर त्याचे झुलविणारे बोल काढायला सुरुवात केली. मी टाळ वाजवू लागलो, ‘‘टिंग, टिंग, टाँग’’ आणि जॉर्जने ताबडतोब तो ताल बरोबर पकडला. यमुना आपल्या खणखणीत व मधुर आवाजात हृदयाच्या गाभाऱ्यापासून गात कीर्तन ‘नेतृत्व’ करत होती. जानकी मधूनच ओरडायची. ‘‘हरी हरी बोल!’’ यमुनेच्या नेतृत्वाखाली चाललेले कीर्तन दीर्घ व कर्णमधुर होते. आनंदी चेतनेत आम्ही बराच वेळ गात होतो. पावन हरिनामाचे कीर्तन ऐकून जॉर्ज खरेच भारावून गेला होता. ‘‘चैतन्य महाप्रभूंनी ते अत्यंत सुलभ व सर्वांना सहजासहजी उपलब्ध करून दिले आहे,’’ यमुना म्हणाली आणि ती बासमती तांदळाच्या केशर भाताची मोठी थाळी घेऊन आली.

## ‘हरे कृष्ण’ महामंत्राचे ध्वनिमुद्रण

‘‘हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे । हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।’’ यमुना व श्यामसुंदर यांच्या मुख्य आवाजातले हे ध्वनिमुद्रण फार छान पार पडले. पार्श्वसंगीताचा भाग असलेली आमची तालवाद्ये लयबद्ध व सुंदर साथ देत होती, परंतु त्या दोघांच्या आवाजावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत नव्हती. प्रारंभिक संगीत जॉर्जने आपल्या गिटारवर दिले होते. कीर्तनाची गती व आवाज हळुहळू वाढत

एका आश्चर्यकारक चरमबिंदूपर्यंत पोहोचला व त्याच वेळी मालतीने तिथे टांगलेली पितळी घंटा वाजविली, ''टण्''. त्या घंटानादाने आम्हा सर्वांची हृदये एकाच वेळी थबकली. तो घंटानाद अस्थानी व अवेळी केल्यासारखा वाटला, कारण या ध्वनिमुद्रणाच्या सरावाच्या वेळी आम्ही त्याचा समावेश केलेला नव्हता. आम्हाला वाटले, हे संपूर्ण ध्वनिमुद्रण पुन्हा एकदा करावे लागणार.

जॉर्ज शांत होता. माला इवान्स या भटक्याने पापणीही हलविली नाही. जॉर्जने आम्हा सर्वांना तांत्रिक कक्षामध्ये ते ध्वनिमुद्रण ऐकण्यासाठी नेले. मी जॉर्जच्या शेजारी बसलो, कारण त्याने 'इयरफोन' घातले होते. हलके हलके महामंत्र उलगडू लागला व आम्ही कान लावून ऐकत होतो. ते ध्वनिमुद्रण अत्यंत सहजसुंदर व प्रेरणादायक झाले होते. जॉर्जने काही नियंत्रक तरफा (levers) मागे पुढे सरकविण्यास सुरुवात केली. तो विविध ट्रॅक्सचा आवाज कमी – जास्ती करत होता. पॉल व लिंडा मॅकार्थी कक्षात आले, पण ते कोणाच्याच लक्षात आले नाही, कारण आम्ही सर्वजण त्या घंटानादाची वाट पहात होतो. पुन्हा एकदा कीर्तनाचा आवाज शिगेला पोहोचला आणि शेवटी 'टण्' करून झालेला घंटानाद अगदी परिपूर्ण व सुयोग्य होता आणि त्यामुळे या ध्वनिमुद्रणाला छानसा, निर्णायक व परिणामकारक शेवट मिळाला. जॉर्जने आम्हाला स्टुडियोमध्ये परत जाऊन आमचे 'समूहगान' पुन्हा एकदा करण्यास सांगितले. आम्ही ते मोठ्या आनंदाने, एकदा नव्हे तर दोनदा केले. तसे करताना मजा आली. आधी आम्ही फक्त आठजणच होतो, नंतर सोळाजण. जॉर्जने तर आपले चिटणीस, फडणवीस, कारकून, शिपाई इत्यादी सर्वांना ध्वनिमुद्रणासाठी बोलावले व अंततः आमच्या सहगायकांच्या 'टोळी' मधील एकूण आवाजांची संख्या अठ्ठेचाळीस झाली. मला हे सर्व पाहून मोठी गंमत वाटली. पॉल मॅकार्थी हा नियंत्रण कक्षातील 'स्टुडियो इंजिनीयर' बनला. जॉर्जने पुन्हा एकदा आम्हाला नियंत्रण कक्षात ध्वनिमुद्रण ऐकण्यासाठी बोलावले. तो शुद्ध व सात्त्विक मंत्र आम्ही आनंदाने ऐकला. आम्ही ध्वनिमुद्रित केलेले पावन गायन व वादन ऐकून मी प्रेरित व उत्तेजित झालो होतो. पॉल व लिंडा हे दोघे पण महामंत्रांच्या तालाबरोबर माना डोलवत होते व खुशीत हसत होते. त्यांना ध्वनिमुद्रण आवडल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते आणि थोड्याच वेळात त्यांनी स्वतः पण गायला सुरुवात केली.

## 'गोविंदम् आदि पुरुषम्' चे ध्वनिमुद्रण

‘‘मी आदिपुरुष श्रीगोविंदांना नमन करतो की, ज्यांचा श्रीविग्रह पूर्णपणे आनंदमय, उज्ज्वल, सत्य व ज्ञानमय आहे. त्यांच्या दिव्य व अलौकिक शरीराचा प्रत्येक अवयव इतर सर्व अवयवांच्या वृत्तीने व शक्तीने युक्त असून कोणतेही कार्य करण्यास समर्थ आहे. ते अशा अगणित भौतिक व आध्यात्मिक ब्रह्मांडांची निर्मिती, पालन–पोषण व नियमन करतात.’’

जॉर्जने या ध्वनिमुद्रणाच्या संपूर्ण सत्राचे संचालन व दिग्दर्शन केले. आम्ही सर्वजण आपल्या अंगातील कलेचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट व्हावे यासाठी एका अनामिक दबावाखाली होतो, तरीपण जॉर्ज एव्हढ्या मोठ्या समूहाला हाताळण्यात तरबेज होता. जॉर्जने आमच्या गायकांच्या घोळक्यांच्या मागे व वादकांच्या मागे आवाज पसरविणारी पॅनेल्स लावली होती. इशान तुतारी (trumpet) जरा कर्कश व काहीशी बेसुरी वाजवत होता, म्हणून जॉर्जने त्याला किंचित दूर व्हरांड्यात पाठवले.

‘गोविंदम् आदि पुरुषम्’ च्या मुख्य ओळी यमुनाने गायिल्या.

मुकुंद मुख्य मृदंग वादक होता व मी मुख्य टाळ वादक होतो. मी गाण्याच्या शेवटी टाळावर एक गतिमान धुन वाजवली. श्यामसुंदर ‘एसराज’ हे वाद्य वाजवत होता, आणि अमेरिकेत जन्मलेल्या हरी विलासने ‘औड’ हे वाद्य वाजवले. त्या वाद्याचे मध्यपूर्वेतील सूर यमुनेच्या मुख्य ओळी व इतर गायकांचे समूहगायन या दोन्हींच्या मधे समाविष्ट करण्यात आले होते. जॉर्जने सुरुवातीचे गिटारवादन व संपूर्ण गाण्याच्या ध्वनिमुद्रणासाठी हार्मोनियम वादन केले. जॉर्ज मार्टिनने सारंगी वादक व लंडन फिलहार्मोनिकच्या अन्य वादकांना दिग्दर्शित केले. या वादकांनी आवाजाची एक भव्य व दिव्य अशी ‘भिंत’ उभी केली आणि त्यामुळेच ‘गोविंदम्’ चे ध्वनिमुद्रण असे एकमेवाद्वितीय झाले. ही ध्वनिमुद्रिका सर्वत्र नावाजली गेली व तिची विक्रमी विक्री झाली. ‘राधा कृष्ण मंदिर’ या ध्वनिमुद्रिकेच्या खपाने कित्येक देशांत उच्चांक गाठला व सगळीकडे ती प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचली.

श्रील प्रभुपादांनी ‘गोविंदम्’ चे ध्वनिमुद्रण ऐकले तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांनी सर्वांना सूचना दिली की, जगातल्या प्रत्येक इस्कॉन मंदिरात सकाळी विग्रहांच्या श्रृंगार दर्शनाच्या वेळी ‘गोविंदम्’ ची ध्वनिमुद्रिका वाजविली जाईल. आजही जेव्हा ‘गोविंदम्’च्या शेवटी समूहगानाचा आवाज टिपेला पोहोचतो, तेव्हा माझ्या डोळ्यात अश्रू तरारतात.

एकदा आम्ही सातजण मिस्टर ड्रायबर्ग यांना भेटायला गेलो होतो. यमुनेने एका रुग्णाशी जोराने हस्तांदोलन केले व ती म्हणाली, ''मिस्टर ड्रायबर्ग, आपल्याला भेटून आम्हा सर्वांना खूप आनंद झाला''. तो आजारी माणूस थरथर कापू लागला. त्या खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यातून एक रूक्ष ब्रिटिश आवाज ऐकू आला, ''अरे, मिस्टर ड्रायबर्ग तर मी आहे.''आम्ही सात जणांनी त्या भांबावलेल्या रुग्णाला सोडले व योग्य त्या बिछान्याजवळ आलो. यमुनेने पुढाकार घेतला व ती त्यांना म्हणाली, ''मिस्टर ड्रायबर्ग, अखेर एकदाचे तुम्हाला भेटून आम्हाला आनंद झाला.'' सर्वजण खळखळून हसले. मिस्टर ड्रायबर्ग म्लानपणे हसले. त्यांच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया व्हायची होती, आणि आम्ही त्यांच्यासाठी टेप्स व वाचण्यासाठी पुस्तके आणली होती.

## श्रील प्रभुपादांचे पत्र

''जेव्हा तुम्हा लंडनवासीयांची व जॉर्ज हॅरिसनची आठवण येते तेव्हा मला खूप बरे वाटते. कारण तुम्हा सर्वांची एकजूट खूप आशादायक आहे. जॉर्ज, 'यापुढे निरर्थक ध्वनिमुद्रिका बनवायच्या नाहीत' असे म्हटल्याचे कळाले, तेव्हा मला खूप आनंद झाला. जॉर्जची आताची ध्वनिमुद्रिका फार मौल्यवान आहे. निरर्थक ध्वनिमुद्रिकांची निर्मिती करण्याऐवजी, त्याची गुणवत्ता व लोकप्रियता यांचा वापर 'गोविंदम्' सारख्या चांगल्या ध्वनिमुद्रिकांची निर्मिती करण्यासाठी करता येईल. आपल्या वैष्णव साहित्यात शेकडो–हजारो सुंदर व अर्थपूर्ण भजने व गीते आहेत आणि त्यांचे जॉर्ज हॅरिसनच्या देखरेखीखाली ध्वनिमुद्रण केले गेले तर ध्वनिमुद्रिकांच्या व्यवसायात क्रांती घडून येईल.''

''म्हणून जेव्हा जॉर्ज हॅरिसन म्हणतो की, 'मी यापुढे निरर्थक ध्वनिमुद्रिका बनवू इच्छित नाही' तेव्हा तो 'हा धंदा बंद करायचा आहे' असे थोडेच म्हणतो? याउलट, त्याला जगाला आजतागायत माहीत नसलेल्या सुंदर व अलौकिक गीतांच्या ध्वनिमुद्रिकांचे उत्पादन करण्याची सुवर्णसंधी मिळेल. तू पुन्हा त्याला भेटशील तेव्हा, या पत्रात मी जे काही म्हटले आहे, त्या संदर्भात त्याच्याशी चर्चा कर.विशेषकरून तुझी सुविद्य व गुणवान पत्नी श्रीमती यमुना देवी हिचा, सुंदर व भक्तिरसपूर्ण कृष्णभावनाभावित भजने गाण्याबद्दल, मी मनापासून आभारी आहे. भगवान श्रीकृष्ण तिला व तुम्हा सर्वांना खचितच आशीर्वाद देतील''.

''सर्व मुलांना व मुलींना माझे शुभाशीर्वाद सांग. सारे सुखात राहा.''